

भावभक्तीने हाक मारिता
साई नच पळभरही थांबता
मायाजाळी करी मुक्तता
संकटात धावून मागुता
सबका मालिक मागे असता
भयचिंतेचे नाही कारण ॥ ७ ॥

जरी मी गेलो देहा सोडून
येईन भक्तासाठी धावून
तुम्ही पाहता माझ्याप्रत
पाहीन मी तुम्हांकडे सतत
श्री साईंच्या समाधीतूनि
ईश्वरवचनां करणे श्रवण ॥ ८ ॥

समाधीवरी माथा टेकूनि
तन्मय होऊन ऐका कानी
अस्थि साईंच्या बोलती अजूनि
निज भक्तांसी तुर्बतीतूनि
साई म्हणती कृष्णासंगे भक्ता
ये करण्या संभाषण ॥ ९ ॥

नको रुपय्या पैसा आणा
श्रद्धा सबुरीचीच दक्षिणा
स्पर्श करोनि साईचरणा
अर्पा दरबारी नजराणा
प्रियकर साई भक्त प्रेयसी
साईप्रेमाचे हे आचरण ॥ १० ॥

असा व्यग्र जरी निजसंसारी
साईनाम घ्या नित्य अंतरी
कुठेही असा कसेही असा
असोत हृदयी साईपद ठसा
वसा घेऊनि साई म्हणती
मम फकिराची ठेवा आठवण ॥ ११ ॥

शिरडीक्षेत्री चला भक्तगण
तिथे गाऊ साईरामायण...

रचना : प्रा. डॉ. माधवराव दीक्षित
१२०६/३२-अ, शिरोळे रोड,
जोग क्लासेससमोर, भोंडे बंगला,
शिवाजी नगर, पुणे.

□□□

प्रत्यक्ष साईबाबांच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या साईलेकराचे अनुभवकथन

# मी पाहिलेले साईबाबा !

- गणेश जयदेव चितांबर

**मी** श्री साईबाबांना पाहिले व त्यांचे अनेकदा दर्शन घेऊ शकलो म्हणून माझी ओळख झालेले साई-भक्त मी एक भाग्यवान पुरुष आहे, असे मानतात. मी स्वतःला खरोखरच भाग्यवान समजतो, तो यासाठी की, मी साईबाबांना केवळ पाहिले आणि त्यांचे अनेकदा दर्शन घेऊ शकलो, एवढेच नव्हे तर, जो सत्पुरुष एवढा मोठा आहे की, ज्याला सारा भारतच काय, 'देव' आहे असे मानणारे जगातील सर्व देवभक्तही, "साईबाबा एक देवावतारच आहेत", असे मानतात, अशा सत्पुरुषाजवळ दिवसातील कितीही वेळ घालवावा, त्यांच्या मांडीवर बसावे, ते आपले आजोबा आहेत, अशा थाटात त्यांच्याशी बोलावे व त्यांनी माझे कौतुक करावे, असे महत्‌भाग्य मला लाभले. परंतु, त्या वयात मला कळत नव्हते की, आपण इतक्या मोठ्या अवतारी पुरुषाशी इतक्या जवळून बोलतो आहोत आणि तो आपले लाड करतो आहे.

त्यावेळी मी इतका भाग्यवान होतो, हे अलीकडे - फारच उशिरा मला समजले. साईभक्तांची 'श्रद्धा आणि नितांत भक्ती' यामुळे ते मला त्यांच्यापेक्षा अधिक भाग्यवान समजत असले आणि मला मान देत असले तरी, मी त्या दृष्टीने किती लहान आहे, याची जाणीव मला आहे व ती जाणीव मी सतत जोपासतो. त्यामुळे साईबाबांविषयीच्या वाङ्मयात भर घालणारे जे अनेक बुद्धिमान साईभक्त आहेत, त्यांच्या रांगेत माझा नंबर कुठेही नसेल, हे मी जाणतो. मी एवढेच म्हणेन की, साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे आणि त्यांच्या आशीर्वादानेच मला जीवनात सर्वकाही मिळाले आहे.

साईबाबांच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या साईलेकराचे, त्यांनी वृद्धापकाळी वयाच्या ७५ व्या वर्षी लिहून ठेवलेले अनुभवकथन, इंदूरचे साईभक्त बापूसाहेब निरखे यांच्याकडे हस्तलिखित रूपात दिले होते. श्री. निरखे (वय वर्षे ८१) यांनी नुकतेच ते 'साईलीला'कडे पाठविले. हा अनुभवाचा अमृतठेवा वाचकांना निश्चितच साईस्मरणाने रोमांचित करेल. वृद्धापकाळी लिहिलेल्या या आठवणीतील तपशिलापेक्षा भावभक्तीतून होणाऱ्या साईदर्शनाने साईभक्त कृतार्थ होतील, असे वाटते.

मी अंधश्रद्धा असलेला भक्त नाही, म्हणून सातत्याने, प्रामाणिकपणे परिश्रम करण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तरीही, मानवाच्या प्रयत्नास यश येणे वा न येणे हे त्याच्या एकट्याच्या हातात नसते व सत्पुरुष पाठिराखा असल्याशिवाय प्रयत्नांना यश येत नाही, असे माझे प्रामाणिक मत आहे. 'परमेश्वर' कोणत्या ना कोणत्या रूपाने आपल्या पाठिशी असतो; ते रूप आपल्याला समजत नाही एवढेच. म्हणूनच, 'परमेश्वर' 'अदृश्य' स्वरूपात असतो, असे सर्व धर्म सांगतात. कधी तो विष्णुरूपाने, कधी ब्रह्मा-विष्णू-महेशरूपाने, म्हणजेच दत्तात्रयाच्या रूपाने, तसाच तो 'साई'रूपानेही प्रगट होतो. त्यामुळे मानवीरूप धारण केल्यानंतर त्याला जन्म-वाढ-कार्य व त्या देहाने इहलोक सोडून जाणे, या मानवास डोळ्याने दिसणाऱ्या व जाणवणाऱ्या अवस्था स्वीकाराव्या लागतात व नंतर 'अनंतात' विलीन होणे क्रमप्राप्त होते. श्रीकृष्णालाही ते चुकले नाही.

"**कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**", असे अर्जुनाला कृष्णाने सांगितले.

असे युगपुरुष सर्व जगात झाले. भारतात तर भाषा, प्रांत, जात-धर्म या मर्यादा ओलांडून संत कबीर, संत




ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि श्री साईबाबा यांच्यासारखे अनेक युगपुरुष झाले. यांपैकी साईबाबा वगळता इतर सर्वांनी मौखिक व लिखित शब्दांद्वारे आपले तत्त्वज्ञान प्रतिपादिले. साईबाबा जे एकदा एका लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडीत आले ते शिरडी गाव त्यांनी आजन्म सोडले नाही. तेथील एका नीमवृक्षाखाली बसून त्यांनी आपल्या गुरुची (त्यांनी आपल्या गुरुचे नाव कोणासही कधीही सांगितले नाही.) तपश्चर्या केली व तेथेच त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले, असे सांगतात. तो नीमवृक्ष तेथे अद्याप उभा आहे. त्याच्याखाली संगमरवरी दगडावर एक शिलालेख आहे. तो नीमवृक्ष ज्या वाड्यात होता (आहे) त्या वाड्यात दोन बाजूला समोरा-समोर बांधलेली जुन्या पद्धतीची घरे होती. त्यांपैकी नीमवृक्षाच्या पाठिशी (शिलालेखाच्या पाठिशी) असलेल्या वाड्यात आम्ही (माझे आई-वडील, भाऊ आणि मी) रहात असू. त्या ठिकाणी आता साईसंस्थानने बऱ्याच मोठ्या इमारती बांधल्या आहेत.

माझा जन्म शिरडीतला. साईबाबांच्या मशिदीच्या (द्वारकामाई) पूर्वेस असलेल्या एका घरात त्यावेळी माझे वडील (कै. दाजी ऊर्फ जयदेव वामन चितांबर) रहात असत. त्यांना आम्ही मुले 'अण्णा' म्हणत असू आणि आईला 'बाई' म्हणून हाक मारीत असू. अण्णा शिरडी येथील जिल्हा लोकल बोर्डाच्या मराठी शाळेचे मुख्याध्यापक होते; त्यांच्याकडे पोस्टाचेही काम असे. माझे थोरले भाऊ संगमनेरला शिकायला होते. कारण, शिरडीतील शाळा फक्त मराठी चौथीपर्यंत होती. माझ्या थोरल्या बहिणीचा विवाह माझ्या जन्मापूर्वीच झाला होता. त्यामळे घरात ती. अण्णा, ती. सौ. बाई व मी असे आम्ही तिघेच. ती. अण्णा शाळेत गेले की, मी साईबाबांच्या मशिदीत जाई व त्यांच्याजवळ बसत असे. त्यांच्यासमोर नेहमी धुनी (अग्नी) असे. आता जेथे 'बसलेला' मोठा फोटो आहे तेथे लोडाला टेकून ते बसत. त्यांच्या उजव्या हाताच्या भिंतीत जमिनीपासून आढ्यापर्यंत एक सुमारे तीन फूट रुंद व एक फूट खोल असे बिन दारांचे व बिन कप्प्यांचे कोनाडे होते. त्यात भले मोठे शिळे हार किंवा फुलांचे गालीचे असलेल्या चादरी लोंबत असत. मी चारच वर्षांचा असल्यामुळे त्या काळातील नियमांनुसार मला शाळेत जाता येत नव्हते. त्या काळात कच्चीत (आता तिला आपण मॉंटेसरी म्हणतो) नांव घालण्यासाठी सहा वर्षांची अट होती व माझे वडील अतिशय कठोर व नियमांचे तंतोतंत पालन करणारे असल्यामुळे मला ते शाळेत नेत नसावेत. शाळेत (शिकण्यासाठी) जावे, हे माझ्या गावीही नव्हते.

## हा तुझा बाप आहे !

मी साईबाबांजवळ इतका रमून जाई की, मी त्यांच्या स्नानाच्या वेळीही तेथेच असे. एकदा रात्री मी असाच त्यांच्याजवळ बसलो होतो. झोपायची वेळ झाली होती; म्हणून माझी आई मला न्यायला आली. तिला माझा खूप राग आला होता. ती मला घरी घेऊन जाऊ लागली.. मी जाईना. तेव्हा तिने मला बखोटीला धरून कडेवर घेतले व घराचा रस्ता धरला. मशिदीतून बाहेर गेल्यावर तिने मला एक चापट मारली व ती मला पुष्कळ रागावलीही. ते ऐकून तेथे असलेल्या एका इसमाला बाबांनी हाक मारून सांगितले, "त्या बाईंना मी बोलावले आहे, सांग." त्याचा निरोप मिळताच बाई साईबाबांकडे परतली. तेव्हा त्यांनी माझ्या आईला सांगितले, "हे पहा, हा तुझा गेल्या जन्मीचा बाप आहे








**आणि त्यावेळचा माझा मित्र आहे. याला पुन्हा मारू नकोस.''** माझ्या आईने मला पुन्हा मारल्याचे मला आठवत नाही. या सर्व प्रसंगाची आठवण माझ्या आईने एका प्रसंगी माझ्या वडिलांना सांगितली.

या काळात साईबाबांची दुपारची आरती झाली की, ते एका पायरीवर उभे रहात आणि नैवेद्यासाठी भक्तांनी आणलेल्या सर्व ताटांमधील अन्न दर्शन घेणाऱ्या (पाया पडणाऱ्या) उपस्थितांना वाटून टाकीत. मात्र, सुरुवातीस त्यांच्या नैवेद्याच्या एका ताटलीतील बर्फीच्या मुदी ते वाटीत. सुमारे ३० ते ३५ छोट्या मुदी असत. ज्यांना पोट भरण्यासाठी अन्नाची जरूरी नव्हती अशांना ते थोडीशी बर्फी देत. त्यातील एक छोटीशी मूद सर्वप्रथम मला मिळे. माझी आई तो प्रसाद बांधून ठेवी व दिवसभरात परगावाहून वेळी-अवेळी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना — ते घरी आल्यास - थोडासा प्रसाद देत असे.

एके दिवशी आजारपणामुळे मी आरतीला जाऊ शकलो नाही. तर, साईबाबांनी प्रसाद वाटण्यास सुरुवात करायच्या वेळी माझा तपास केला व आरती करणाऱ्या पुजाऱ्याबरोबर बर्फीची छोटीशी मूद आमच्या घरी पाठवली. यामुळे आमच्या घरातील सर्वांनाच आनंद झाला आणि 'दूरदूरच्या साईभक्तांना हा प्रसाद देण्यातील' त्यांचा आनंद दुणावला. हे कर्तव्य पार पाडण्यातील. आनंद इतरांना हल्लीच्या काळात कळणे कठीण आहे, अशी आजची स्थिती आहे. ''आपल्याजवळ जे काही थोडे चांगले आहे ते ज्यांना हवे आहे — त्यांना दिले पाहिजे'', ही गोष्ट तेव्हापासून माझ्या मनावर बिंबली आहे. असे करताना आपण कोणावरही उपकार करीत नसतो. घेण्यापेक्षा गरजूंना देण्यात जास्त आनंद असतो.

साईबाबांनी न बोलता, अबोल राहून केवळ कृतीतून सर्वांना फार मोठी शिकवण दिली. आपल्या अशा परोपकारी कृतीची त्यांनी वाच्यताही केली नाही; गाजावाजा तर दूरच.

या घटनेशी संबंध नसलेली एक मजेशीर आठवण सांगावी, असे मला वाटते. एक दिवस दुपारी चारच्या बेतास मी असाच साईबाबांजवळ बसलो होतो. अगदी लहान मुलाशी बोलतात तसं साईबाबा माझ्याशी बोलत होते. बाबा मला म्हणाले, ''वडिलांकडे जा ! त्यांना म्हणावं, बाबांनी दक्षिणा मागितली आहे.'' मी, ''बरं'' म्हटलं आणि लगेच अण्णांकडे शाळेत गेलो. त्यांना बाबा काय म्हणाले ते सांगितल्यावर त्यांनी मला 'चवली' (२ आण्याचे नाणे) दिली. चवली घेऊन मी बाबांकडे गेलो आणि बाबांना ती चवली दिली. मी त्यावेळी बाबांच्या पाया पडलो नाही. दिवसभर घरात वागतात तसाच मी वागत होतो. बाबांनी चवली घेतली आणि लगेच म्हणाले, ''ही चवली आता वडिलांना परत नेऊन दे ! मी तुझी गंमत केली.'' मी ती घेतली आणि परत अण्णांकडे गेलो. त्यांना बाबा काय म्हणाले ते सांगितले. त्यावर अण्णा म्हणाले, ''अरे, एकदा दिलेली दक्षिणा परत घेत नसतात. जा, आणि ती बाबांना परत देऊन टाक !'' मी परत बाबांकडे गेलो आणि अण्णा काय म्हणाले ते सांगून त्यांना ते नाणे परत केले. मग मात्र त्यांनी ते घेतले. कशी गंमत झाली, असं त्या वयात मला वाटलं. नंतर मात्र जसजसं वय वाढू लागलं तसतसं, ''एकदा दिलेलं दान परत घेऊ नये'', हे माझ्या मनावर चांगलच ठसलं. ऐपतीप्रमाणे दान करावं, हा धडा मी यातून शिकलो आणि माझ्या परीने तो उर्वरित आयुष्यात गिरवला.











साईबाबा समाधिस्थ झाल्यानंतरची गोष्ट. मी सुमारे १४ वर्षांचा होतो. तालुक्याच्या गावीही इंग्रजी शाळा नव्हती. त्यातच घरात दारिद्र्य. त्यामुळे मला माझ्या थोरल्या बहिणीच्या नणंदेकडे नाशकास पुढील शिक्षणासाठी रहावे लागले. त्यांना आम्ही 'बबूआत्या' म्हणत असू. त्यांच्याकडे पंढरपुरला दरवर्षी जाणाऱ्या एक मराठा बाई व त्या बाईंचा मुलगा होता. आत्याबाई ज्या अन्नछत्रात स्वयंपाकासाठी होत्या त्या अन्नछत्रात मला त्या आठवड्यातून एकदा-दोनदा जेवायला नेत असत. मी वार लावण्याचाही प्रयत्न केला. एके दिवशी आत्याबाईंच्या देवाजवळच्या अक्षता (तांदूळ) ठेवण्याच्या डबीतले चार आणे चोरीस गेले. त्या मला म्हणाल्या, "हा दुसरा मुलगा देवाजवळ कसा शिवेल ? तूच ते चार आणे चोरलेस !" मी त्यांना पुष्कळदा सांगितले, "मीं चोरले नाहीत." पण, त्यांचा विश्वास बसेना; म्हणून मी माझ्या वडिलांना शिरडीस ही हकीकत पत्राने कळविली. त्यांचे मला उलटटपाली पत्र आले, "तुझ्याजवळ भाड्याला पैसे नसल्यास पुस्तके विकून पैसे कर आणि इकडे निघून ये ! असा आळ-आक्षेप सहन करू नकोस. तुला श्रीमान बुट्टी नागपुरला शिकायला नेतील."

मी हे पत्र वाचून हुरळलो. आपल्या वडिलांचा आपल्यावर विश्वास आहे, याचा मला खूप आनंद झाला. मी खरोखरीच पुस्तके विकली. भाड्यापुरते पैसे मला मिळाले. शाळेत (न्यू इंग्लिश स्कूल) मुख्याध्यापकांना (मा. भागवत यांना) पत्र दाखविले. त्यांनीही माझा एक वार घेतला होता. त्यांनी मला शाळा सोडल्याचा दाखला दिला. मी सर्व सामानासह (पुस्तके, वह्या, अंथरूण-पांघरूण) शिरडीला आलो.

शिरडीला पोहोचल्यावर माझा भ्रमनिरास झाला. कारण, श्रीमान बुट्टींनी मला नागपुरला नेले नाही. मी आईला विचारले. ती म्हणाली, "अरे बाबा, त्या बुट्टींना भविष्य येतं म्हणून यांनी तुझी कुंडली त्यांना दाखविली. ते म्हणाले, "या मुलाचं शिक्षण होणार आहे." यांना वाटलं की, बुट्टी तुला नागपुरला नेतील; कारण त्यांच्याकडे खूप मुले शिकायला आहेत. कसचं काय अन् कसचं काय ?"

मी निराश झालो... घरासमोर असलेल्या साईबाबांच्या गुरुस्थानास व नीमवृक्षास रोज १०८ (एकशे आठ) प्रदक्षिणा घालू लागलो. लवकरच मला अहमदनगरच्या त्यावेळच्या अनाथ विद्यार्थीगृहात प्रवेश मिळाला. त्यामुळेच मी इंग्रजी ४ थी इयत्तेचे नंतरचे शिक्षण घेऊ शकलो. मध्यंतरीच्या काळात माझी कुठेच शिक्षणाची सोय न झाल्यामुळे मी शिरडीसच होतो. त्या काळात माझ्या नाकाच्या हाडास उजव्या बाजूस एक 'मस' आला. तो वाढू लागला. त्यावेळी मुंबईतील एक डॉक्टर आजारी झाल्यामुळे शिरडीला हवा पालटण्यासाठी आले होते. ते रोज सायंकाळी फिरायला जाताना मला घरी येऊन घेऊन जात असत. मी त्यांच्याबरोबर रोज सायंकाळी फिरावयास जाई. आईने मला विचारले, "हे गृहस्थ कोण आहेत ?" मी तिला, "ते मुंबईचे डॉक्टर आहेत", असे सांगितले. त्यावर ती म्हणाली, "अरे, तुझ्या नाकावर आलेला 'मस' त्यांना दाखवून काय औषध करावं ते विचार." त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी फिरायला गेल्यावर त्यांना मी विचारलं. ते म्हणाले, "नाकाच्या त्या भागात एक पिशवी असते. त्या पिशवीत अश्रू साठून ते थिजलेत. त्याचे ऑपरेशनच करावे लागते आणि ते फक्त मुंबईलाच होईल









(तो काळ १९२७ च्या सुमाराचा) आणि त्याला ७५/- रु. खर्च येईल. हा फक्त ऑपरेशनचा खर्च, जाण्या-येण्याचं भाडं, मुंबईत रहाणं आणि कोणी सोबत पाहिजे ते वेगळं'' हे सर्व मी आईला सांगितलं. त्यावर ''हरे राम !'', असे तिने निराशेचे उद्गार काढले.


## नवे नामकरण

त्यावेळी तिला मागील घटनेची आठवण झाली की, बाबांनी तिला सांगितलं होतं, ''हा मागील जन्मातील माझा मित्र आणि तुझा बाप आहे. त्याला पुन्हा मारू नकोस.'' त्याचबरोबर तिला आठवलं की, तिच्या वडिलांच्या नाकावर असाच 'मस' होता. याचं नाव तरी बदलून (ठेवून) पहावं. ती आपल्या वडिलांना 'आप्पा' या नावाने हाक मारीत असे. (मला त्यांचे पूर्ण नाव माहीत नाही, याचे मला आता फार वाईट वाटते.) तिनिसांजेला देवापुढे समई लावून झाल्यावर अण्णांनी मला देवघरासमोर उभे केले. मला साईबाबांची उदी लावली. त्यावेळी माझं नाव 'आप्पा' ठेवल्याचं साईबाबांच्या फोटोकडे पाहून सांगितलं आणि नवीन नाव ठेवल्याबद्दल देवापुढे साखर ठेवून ती वाटली.

त्या दिवसापासून बाई आणि अण्णा (आई आणि वडील) मला 'आप्पा' याच नावाने हाक मारू लागले; आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, माझा तो 'मस' हळूहळू आकाराने कमी होऊन चार दिवसांनी दिसेनासा झाला. याचे त्या डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले. मी आता ७३ वर्षे पूर्ण करून ७४ व्यात प्रवेश केला आहे. मला ३५ साली (जुन्या) एफ्. वाय.ला शास्त्रात विशेष गुणवत्ता मिळालेली आहे. माझा शास्त्रीय कारणमीमांसेवर पूर्ण विश्वास असूनही वरील घटना मी नाकारू शकत नाही. कारण, ती घटना मी स्वतः अनुभवली आहे.

मी दुसरी एक पाहिलेली घटना येथे सांगण्याचा मला मोह होतो. शिरडीत एके दिवशी दोन-तीन माणसे एका मोठ्या लाकडी पिंजऱ्यात एक भला मोठा वाघ घेऊन आली. एका माणसाच्या हातात दोन मोठाल्या भरपूर रुंद पितळेच्या कड्या होत्या. त्यांचा आवाज मोठी झांज वाजविल्यासारखा खळखळ होई. तो माणूस आपला तो हात सारखा हालवी, आवाज करी व पिंजऱ्याभोवती हिंडे आणि बाहेरून एका लांब काठीस लावलेल्या भाल्याच्या टोकाने त्या वाघास टोची. त्यामुळे वाघ संतापून आक्राळ-विक्राळ तोंड करून डरकाळी फोडी व जसाजसा तो माणूस फिरे, तसातसा वाघ आपल्या अंगाभोवती (अंगाला भाला टोचला की) फिरे. त्या खळ-खळ आवाजाने खूप गर्दी जमली. थोड्या वेळाने ही माणसे हात पुढे करून भीक मागत. अशा तऱ्हेने गावोगाव जाणे व पैसा मिळविणे, हा त्यांचा धंदा असावा.

ते शिरडी गावातून गावभर फिरून गावाबाहेर पडताना मशिदीजवळील वेशीजवळ आले. त्या माणसांनी त्या वाघाला खूपच जाड अशा भल्या मोठ्या दोरखंडाने दोन्ही बाजूंस लांब अंतरावर धरून, दोन्ही बाजूंनी सारखा जोर देऊन, मारूतीच्या देवळात नेऊन मारूतीच्या पाया पडायला लावले आणि नंतर मशिदीत आणून साईबाबांच्या पाया पडावयास लावले. बाबा पहिल्या पायरीवर उभे होते. वाघाने आपले मस्तक बाबांच्या पुढे टेकले मात्र, त्याने आपला प्राण सोडला. सर्वजण म्हणाले, ''बाबांनी वाघास मुक्ती दिली. वाघ स्वर्गवासी झाला.'' या साऱ्या प्रसंगाच्या व त्या वाघाच्या स्मरणार्थ त्या वाघाची प्रतिमा बसविली आहे. तो वाघ









सर्कशीतल्या वाघासारखा खूपच मोठा व आक्राळ-विक्राळ होता. वाघासारख्या प्राण्याची हाल करणारी व त्यांची खेळणी करणारी माणसे वाघापेक्षाही जास्त जंगली व क्रूर असतात. म्हणूनच, ''या माणसांच्या हातून मला सोडवा'', अशी त्या वाघाने केलेली आर्त प्रार्थना बाबांच्या हृदयापर्यंत पोहचली आणि त्यांनी त्याला त्या जाचातून कायमचे मुक्त केले.


साईबाबांनी धारण केलेल्या मानवदेहाचा त्याग केला तोही दसऱ्यासारख्या शुभ दिनी. त्यांनी खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन केले व या पृथ्वीवरील सर्व सीमा ओलांडून ते अनंतात विलीन झाले. त्या दिवशीची दुपारची आरती झाली. सर्व भक्तमंडळी आपापल्या घरी गेली. तेव्हा बाबांनी मला सांगितले, ''तू आता घरी जा; मला झोपायचंय.'' बाबांनी अंग पसरले. पांढरा स्वच्छ कपडा पांघरला. मी घरी गेलो. दुपारी चारच्या सुमारास गावात एकच गडबड सुरू झाली. मशिदीभोवती खूप गर्दी जमली होती. ''बाबा गेले'', ही वार्ता क्षणार्धात गावभर पसरली. मला आई-वडिलांनी बाहेर जाऊ दिले नाही. बाबांची अंत्ययात्रा निघाली. चार-सहा चाके असलेली गाडी होती. तिच्यावर सर्व बाजूंनी गोल आच्छादन तयार केलेले होते. त्यावर अगदी पांढरे स्वच्छ कापड सर्व बाजूंनी नीटनेटके घातलेले होते. गाडी ढकलली जात होती. सर्व गाव लोटला होता. अवती-भोवतीच्या खेड्यांतील लोकही आले होते. शिरडी गावाची त्यावेळची लोकसंख्या फारच कमी होती. परंतु, त्यावेळी गावातील सर्व रस्ते माणसांनी गच्च भरले होते. अण्णा-बाईही (वडील व आई) दारासमोर बाहेर रस्त्यावर येऊन पहात होते. तेवढ्यात, मी खूप पुढे गेलो. ती ढकलगाडी पाहिली. तिला ओढण्यास किंवा ढकलण्यास दांडे नव्हते. ताटीही नव्हती. यात्रा पुढे गेल्यावर मी घरी आलो आणि वडिलांच्या हातचा खूप चोप खाल्ला. कारण, मला अंतयात्रेतील बघ्या अस्पृश्यांचा विटाळ झाला, अशी त्यांनी त्या काळात कल्पना करून घेतली. आईने मला भरपूर गार पाण्याने दूर राहून स्नान घातले.


ही यात्रा गेली कुठे? गावातील त्यावेळच्या प्रमुख रस्त्यांनी ही यात्रा हल्लीच्या साईबाबांच्या मंदिरापाशी नेण्यात आली. देऊळ बांधून होत आले होते आणि त्यात मुरलीधराच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचे ठरले होते. तो वाडा बांधला जात असताना बाबा जेव्हा प्रातःविधीस मशिदीतून गावाबाहेर जात तेव्हा ते कोणी भेटल्यास वाड्याकडे बोट दाखवून सांगत, ''मी गेल्यानंतर इथे रहाणार आहे.'' हे शिरडीतील बऱ्याच व्यक्तींना माहीत होते. म्हणून, सर्व शिरडीकरांनी ठरविले की, बाबांची येथेच समाधी करावी.

साईबाबा मुसलमान होते की हिंदू होते, यावर कोणीही त्यावेळी त्यांच्या हयातीत कधीही वाद घातला नाही. ते एका मुसलमानी घरातील व्यक्तीच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर आले होते. त्यांची आरती होत होती. ती त्यांना मान्य होती. त्यांच्यासमोर सतत अखंड धुनी (अग्नी) असे व ती धुनी अद्यापही आहे. त्याअर्थी ते अग्निपूजक होते.

भक्त बाबांची आरती करीत. ती बाबा रोज ऐकत आणि त्यांनी त्या ओळींना – काव्यांना – कधीच हरकत घेतली नाही. याचाच अर्थ, आरतीतील सर्व आशय त्यांना मान्य होता. उदाहरणार्थ :-

**''कलियुगी अवतार सगुणब्रह्म साचार।**
**अवतीर्ण झालासे। स्वामी दत्त दिगंबर।।''** वगैरे









आणि -

"यवनस्वरूपी ऐक्या दर्शन त्वा दिधले" वगैरे

आणि -

"भेद न तत्त्वी हिंदू यवनांच्या कांहीं
दावायासि झाला पुनरपि नरदेही" वगैरे

आणि -

"ऐसा येईबा। साई दिगंबरा। अक्षय रूपावतारा।
सर्वहि व्यापक तू। श्रुतिसारा।
अनुसया अत्रिकुमारा॥"

अशा अनेक ओव्या किंवा ओळी उद्‌धृत करता येतील.

मी शिरडीस जातो त्यावेळी मी साईबाबांना पाहिले असल्यामुळे दूरदूरहून आलेले साईभक्त जेव्हा माझ्या पाया पडू लागतात तेव्हा मला तेथून पळ काढावासा वाटतो. कारण, तेवढ्याच एका कारणाने "माझ्या पाया पडावे", ही पात्रता माझी नाही, हे मी मनोमन जाणतो. अशा भक्तांना मला संत तुकारामांच्या काव्यपंक्तीत सांगावेसे वाटते :-

**मज पामरा काय हे थोरपण।**
**पायीची वहाण पायी बरी॥**

❑❑❑

# श्री साईबाबांचे मूलभूत सिद्धांत

**- प्राचार्य सी. वाय. कुलकर्णी**

**श्री** साईबाबांनी देहधारी असताना मानवजातीच्या कल्याणाचे, मानवजातीच्या उद्धाराचे आपले अवतारकार्य अव्याहतपणे सुरू ठेवले होते. श्री साईबाबांच्या देवत्वाच्या आणि दिव्यत्वाच्या प्रभावामुळे ते सगुण रूपात असताना अगणित व्यक्तींनी केवळ श्री साईबाबांवरील नितांत श्रद्धेमुळे, विश्वासामुळे, प्रेमामुळे त्यांचे वर्चस्व स्वीकारले होते आणि या व्यक्ती श्री साईबाबांच्या अनन्य भक्त बनल्या होत्या. अल्पावधीतच श्री साईबाबांभोवती अमर्याद भक्तपरिवार निर्माण झाला. श्री साईबाबांनी आपल्या उपदेशांद्वारे, विचारांद्वारे, वचनांद्वारे आपल्या भक्तपरिवाराचे प्रबोधन केले. परंतु, त्यांनी सार्वजनिक स्वरूपाची प्रवचने दिली नाहीत, शिष्यपरंपरा निर्माण केली नाही, आपला स्वतःचा असा पंथ निर्माण केला नाही, संस्था, मठ, आश्रम, पीठ स्थापन केले नाही. श्री साईबाबा अवतारसमाप्तीपर्यंत जनता-जनार्दनाला उपदेशामृत, सद्विचारामृत पाजत राहिले. परंतु, त्यांनी आपल्या विचारांना, उपदेशांना सिद्धांतांचे स्वरूप दिले नाही. मात्र, श्री साईबाबांचे विचार, उपदेश, वचने चिंतनरूपी धाग्यात गुंफली असता निश्चितच एक नितांत सुंदर आणि विश्वकल्याणाचा सुगंध असलेली माला आकार घेते आणि ही माला म्हणजेच श्री साईबाबांचे मूलभूत सिद्धांत. श्री साईबाबांच्या उपदेशांचा, विचारांचा, संदेशांचा, वचनांचा, इतकेच नव्हे तर, श्री साईबाबांच्या









मुखातून प्रगट झालेल्या प्रत्येक शब्दाचा सखोल अभ्यास केला असता एक सत्य प्रकर्षाने प्रगट होते आणि ते म्हणजे त्या सर्वांमध्ये निश्चितपणे एकसूत्रता आहे, सुसूत्रता आहे. श्री साईबाबांची ज्ञात असलेली सर्व वक्तव्ये संकलित केल्यास त्यांमध्ये अव्यक्त रूपात असलेली एक सामाजिक आर्थिक रचना वा व्यवस्था व्यक्त होते आणि केवळ मानवजातीचाच नव्हे, तर संपूर्ण प्राणिमात्राचा उद्धार करू शकेल अशा साईसिद्धांतांच्या गुप्तधनाचा शोध लागतो..

साईसिद्धांतांची स्वतःची अशी वेगळी वैशिष्ट्ये आहेत. म्हणून, मानवाला माहीत असलेल्या विविध सिद्धांतांच्या तुलनेत साईसिद्धांत निश्चितपणे स्वतःचे असे वेगळे अस्तित्व निर्माण करतात. साईसिद्धांतांच्या उदयापूर्वी जगात अनेक विचारवंतांचे सिद्धांत अस्तित्वात होते. मात्र, ते सिद्धांत विशिष्ट कालखंडातील व्यवस्थेत अंतर्भूत असलेल्या समस्यांवरील उपाययोजनेच्या स्वरूपात होते. साहजिकच, ते सिद्धांत आता जवळजवळ कालबाह्य ठरले आहेत, त्यांची उपयुक्तता संपुष्टात येत आहे. मात्र, साईसिद्धांत कधीही कालबाह्य वा अ-प्रस्तुत होणार नाहीत. कारण, हे सिद्धांत कोणत्याही तत्कालीन स्वरूपाच्या सूचनांशी वा समस्यांशी निगडीत नसून मानवाच्या कालातीत असलेल्या मूलभूत समस्यांशी संबंधित आहेत. यास्तव, साईसिद्धांत प्रत्येक शतकातील प्रत्येक कालखंडामध्ये समर्पक वा उपयुक्त ठरतात, जे कधीही टाकाऊ होत नाहीत, सदैव टिकाऊच राहतात.

साईसिद्धांतांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, हे सिद्धांत बोजड किंवा अपवादात्मक आदर्शांवर, नैतिक मूल्यांवर आधारित नसून ते वास्तवतेशी वा वस्तुस्थितीशी निगडीत आहेत. सर्वसामान्य माणसाच्या मानसिकतेवर, विचारपद्धतींवर, दोषांवर, उपदेशांवर, मूल्यांवर आधारित असल्यामुळे साईसिद्धांत हे प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंतर्मनाचे प्रतिबिंब आहे, असेच वाटते. साहजिकच, विभिन्न धर्म, पंथ, व्यवसाय, व्याधी, व्यथा, भाषा, प्रांत असलेल्या व्यक्तींना साईसिद्धांत अगदी सहजपणे समजू शकतात, पटू शकतात; साईसिद्धांत ही आपलीच तत्त्वे आहेत, अशी प्रत्येकाची भावना निर्माण होते. म्हणून, साईसिद्धांत हे इतर सर्व सिद्धांतांपेक्षा अधिक विस्तृत आहेत. साईसिद्धांत हे राज्य आणि देशांच्या भौगोलिक सीमा ओलांडून विश्वात्मक होत चालले आहेत.

साईसिद्धांत श्री साईबाबांच्या मुखातून अत्यंत सहजपणे, नैसर्गिकपणे, स्वाभाविकपणे प्रगटले आहेत. साहजिकच, साईसिद्धांतामध्ये कृत्रिमतेचा लवलेश नाही. साईसिद्धांत श्री साईबाबांनी अत्यंत सोप्या पद्धतीने आणि सर्वसामान्य व्यक्तींना उमजू शकेल अशा दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या शब्दांद्वारे मांडले आहेत. आपल्या भक्तांना आपले सिद्धांत समजावून देण्यासाठी श्री साईबाबांनी अनेक उदाहरणे, आज्ञा, घटना, दृष्टांत, नमस्कार, कथा यांचा अत्यंत उत्कृष्टपणे उपयोग केला. आपले सिद्धांत उपदेशांद्वारे भक्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री साईबाबांनी सर्वसामान्य व्यक्तीच्या भावनांचा आणि आकलन शक्तीचा पूर्णपणे विचार केला होता. श्री साईबाबांनी त्यांचे सिद्धांत कधीही भक्तांवर लादण्याचा प्रयत्न केला नाही. श्री साईबाबांना मानसशास्त्र निश्चितच ज्ञात







होते. त्यांना मानव पूर्णपणे समजला होता. म्हणूनच, त्यांनी सर्वसामान्य व्यक्तीलादेखील सहज मान्य करणे, स्वीकारणे आणि पालन करणे शक्य होईल अशा प्रकारेच आपल्या सिद्धांतांची मांडणी केली. यामुळे इतर सर्व सिद्धांतांपेक्षा साईसिद्धांत प्रत्येक व्यक्तीशी अधिक जवळीक साधतात.

साईसिद्धांतांची कक्षा वा त्यांच्या सीमा या निश्चितपणे इतर सिद्धांतांपेक्षा अधिक विस्तृत आहेत. साईसिद्धांत हे समाजाच्या प्रत्येक घटकाला आपल्यात समाविष्ट करून घेतात. साईसिद्धांतांमध्ये व्यक्तिगत उद्दिष्टे आणि सामाजिक उद्दिष्टे यांत कधीही द्वंद्व वा कलह निर्माण होत नाहीत.

साईसिद्धांतांचे अंतिम उद्दिष्ट हे मानवाची भौतिक प्रगती किंवा भौतिक सुख नसून त्याची आधिभौतिक वा आध्यात्मिक प्रगती हे आहे. साईसिद्धांतांमध्ये मानसिक समाधान अभिप्रेत असल्यामुळे देहसुखाची भावना यांमध्ये अजिबात येत नाही. साहजिकच, साईसिद्धांत हे मानवाला त्याची खरी ओळख करून देतात, मानवजन्माचा खरा अर्थ आणि खरे प्रयोजन काय आहे, हे समजावून सांगतात. म्हणूनच, साईसिद्धांत हे इतर सिद्धांतांपेक्षा अतिशय उच्च



पातळीवरचे आहेत. श्री साईबाबांच्या मूलभूत स्वरूपाच्या काही सिद्धांतांचा उहापोह करण्यांचा प्रामाणिक प्रयत्न या लेखाच्या उर्वरित भागात केला आहे.

## सर्वधर्मसमभाव

श्री साईबाबा देहधारी असताना हिंदू आणि मुसलमान धर्मांच्या अनुयायांमध्ये फारमोठ्या प्रमाणात असामंजस्य होते. याची परिणती धर्मसंघर्षात होऊन मनुष्यबळ आणि मालमत्तेची हानी होत असे, मानवी जीवन असुरक्षित होत असे. या धार्मिक संघर्षाचा गैरफायदा इंग्रज सरकारला होत असे. धार्मिक असामंजस्यामुळे निर्माण होणारे धोके दूर करून सर्व धर्मांच्या अनुयायांमध्ये सलोखा निर्माण श्री करण्यासाठी श्री साईबाबांनी आपल्या भक्तांपुढे सर्वधर्मसमभाव, सर्वधर्मसहिष्णुता आणि सर्वधर्माचरण हे सिद्धांत मांडले.

विविध धर्मांचे अनुयायी असणाऱ्या भारतीयांनी श्री साईबाबांच्या सर्वधर्मसमभाव सिद्धांताचा स्वीकार करणे आवश्यक आहे. म्हणजे भारताच्या प्रगतीमधील एक मोठा अडसर दूर होईल, भारतीयांचे जीवन सुरक्षित होईल आणि त्यांच्या सार्वजनिक स्वरूपाच्या समस्या दूर करणे सहज शक्य होईल. धर्मसंघर्षामुळे होणारी मनुष्यबळाची, श्रमांची हानी थांबेल आणि या अत्यंत उपयुक्त राष्ट्रीय साधनसंपत्तीचा पूर्ण उपयोग मानवी जीवन अधिकाधिक सुसह्य करण्यासाठी होईल. सर्वधर्मसमभावाच्या सिद्धांताचा उपयोग केल्यामुळे धर्मप्रसाराचे कार्य करणाऱ्या, धर्मांतरास उत्तेजन देणाऱ्या संघटनांचे, चळवळींचे पूर्णपणे उच्चाटन होईल आणि या उपद्व्यापांमुळे मलीन झालेली व्यक्तीची, धर्माची प्रतिमा सुधारण्यास मदत होईल. सर्वधर्मसमभावामुळे राष्ट्रीय एकात्मतेची निर्मिती होऊन कोणताही धर्म हा राष्ट्रवादापेक्षा श्रेष्ठ नाही, हे तत्त्व सर्वमान्य होईल.

## श्रमप्रतिष्ठा

श्री साईबाबांनी शारीरिक श्रमांचे, अंगमेहनतीचे महत्त्व ओळखले होते आणि म्हणूनच, प्रत्येकाने शारीरिक श्रम करावेत, असा त्यांचा आग्रह होता. शारीरिक श्रमांचे महत्त्व पटवून देण्यासाठी श्री साईबाबा स्वत:







अंगमेहनतीची कामे करीत असत. प्रत्येकाने श्रमशक्तीचा उपयोग करून आपली उपजीविका करावी, असा श्री साईबाबांचा आग्रह होता. श्री साईबाबांच्या ठायी श्रमांना प्रतिष्ठा असल्यामुळेच श्री साईबाबा स्वत:ची कामे स्वत:च करीत असत; आणि इतरांनी त्यांची कामे केली की, ते आवर्जून त्या कामाचा मोबदला देत असत. केवळ फुकट खायला मिळेल म्हणून श्री साईबाबांच्या आश्रयास आलेल्यांना ते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे शारीरिक श्रमांचे महत्त्व पटवून देत असत. श्री साईबाबांच्या श्रमप्रतिष्ठेचा सिध्दांत हा कोणताही देश संपन्न करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. विशेषत:, भारतामध्ये नैसर्गिक संपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. या नैसर्गिक संपत्तीचा देशाच्या आर्थिक विकासासाठी उपयोग करून घेण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे आणि सुदैवाने भारतात मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. भारतीयांनी शारीरिक श्रम करण्याची तयारी ठेवल्यास निश्चितपणे या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग राष्ट्रीय उत्पादन वाढविण्यासाठी करता येईल, तसेच बेकारीची समस्यादेखील नियंत्रणाखाली आणता येईल. श्री साईबाबांच्या श्रमप्रतिष्ठा सिध्दांताचा



स्वीकार केल्यास श्रमाचा योग्य मोबदला दिला जाईल. यामुळे श्रमिकांच्या आर्थिक शोषणाची समस्या दूर होऊन मंदगती काम, काम बंद, संप आदि आपत्ती भारतावर कधीही कोसळणार नाहीत. पूर्ण वेळ फक्त बौद्धिक काम करणाऱ्यांनी दररोज थोडा वेळ तरी शारीरिक मेहनतीचे, विविध वस्तूंचे प्रत्यक्ष उत्पादन करण्याचे काम केले, तर त्यांना ईश्वराने दिलेल्या श्रमशक्तीचा अत्यंत योग्य प्रकारे उपयोग होईल, तसेच श्रमिकांच्या समस्या ते अनुभवू शकतील. यामुळे श्रमिक जीवनाबद्दलचे त्यांच्या मनातील गैरसमज दूर होऊन कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात सामंजस्य निर्माण होईल, औद्योगिक क्षेत्रातील संप आणि मनुष्यबळाचा नाश करणाऱ्या इतर समस्या दूर होतील.

## मर्यादित गरजा

श्री साईबाबांनी आपली राहणी अत्यंत साधी ठेवून त्यांच्या भक्तांपुढे आपल्या गरजा मर्यादित ठेवण्याचा सिद्धांत मांडला आहे. श्री साईबाबांची सेवा करणारे, सतत श्री साईबाबांच्या सहवासात राहणारे भक्त अनेक होते. परंतु, या भक्तांना श्री साईबाबांनी कधीही धन-दौलत ही संपत्ती दिली नाही. त्यांना श्रीमंत केले नाही. श्री साईबाबांनी या सर्वांची आर्थिक परिस्थिती किमान गरजा व्यवस्थितपणे भागवता येतील इतकीच ठेवली होती. श्री साईबाबांचा गरजा मर्यादित ठेवण्याचा सिद्धांत हा मानवजातीला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवरील अत्यंत प्रभावी उपाय आहे. मानवाच्या गरजा अमर्याद असतात, या अर्थशास्त्रातील सिद्धांतामुळे अनर्थ ओढवलेला आहे. गरजा अमर्याद आहेत, असे गृहित धरल्यास प्रत्येक व्यक्ती आपल्या अधिकाधिक गरजा भागविण्याचा प्रयत्न करील आणि गरजा भागविण्यामध्ये गुंतल्यामुळे त्याची आध्यात्मिक प्रगती होणार नाही. अधिकाधिक गरजा भागविण्याच्या हव्यासामुळेच मानव इतरांवर अन्याय करतो, हे कटु सत्य आहे. अधिकाधिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशामुळे आर्थिक असमतोल, भ्रष्टाचार इत्यादी समस्या निर्माण होतात. गरजा अमर्यादित आहेत, असे मानल्यास अनेक गरजा









पूर्ण करणे मानवास त्याच्या आयुष्यामध्ये शक्य होणार नाही. साहजिकच, मानवाच्या मनात समाधानाची भावना निर्माण होऊन तिचे रूपांतर नैराश्यात होऊ शकते. श्री साईबाबांना ठाऊक होते की, जगामध्ये गरिबी इतक्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे की, गरिबीचे पूर्णपणे उच्चाटण करणे शक्य नाही. म्हणूनच, गरिबी हा शाप न समजता, गरिबीला वाईट न समजता प्रत्येकाने स्वतःहून आपल्या गरजा मर्यादित राखून गरिबीचा स्वीकार करावा. मानवाचा जन्म हा अधिकाधिक गरजा भागविण्यासाठी झालेला नसून परब्रह्माशी एकरूप होण्यासाठी, ईश्वराला समजून घेण्यासाठी झालेला आहे, याची खूणगाठ बांधावी. परंतु, मानवी जीवनाचे हे अंतिम ध्येय गाठण्यासाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. ईश्वरप्राप्तीच्या परम उद्दिष्टापासून मानवाचे मन, चित्त ढळू नये म्हणूनदेखील श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना गरजा मर्यादित ठेवण्याचा सिद्धांत दिला आहे.

## अ-संग्रह

मर्यादित गरजांच्या साईसिद्धांताचा स्वीकार केल्यास असा प्रश्न निर्माण होतो की, यापूर्वी केलेल्या संपत्तीच्या संग्रहाचे आता काय करावे ? श्री साईबाबांनी आपल्या अ-संग्रह सिद्धांताद्वारे या प्रश्नाचे अत्यंत समर्पक उत्तर दिले आहे. असंग्रह म्हणजे, आपल्या सर्व संपत्तीचा विनियोग समाजातील गरजू व्यक्तींच्या मदतीसाठी, कल्याणासाठी करणे. श्री साईबाबा या असंग्रह तत्त्वाचे अत्यंत काटेकोरपणे पालन करीत असत. श्री साईबाबा भक्तांनी अर्पण केलेली दक्षिणा, नैवेद्य, मूल्यवान वस्तू स्वतःच्या वापरासाठी न ठेवता गरजू व्यक्तींमध्ये वाटून टाकीत असत. श्री साईबाबांच्या असंग्रह सिद्धांताचा उपयोग केल्यास श्रीमंत व्यक्तींकडे असलेली विपुल संपत्ती गरीब जनतेच्या उद्धारासाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. त्या श्रीमंतांच्या किमान गरजा भागवून शिल्लक राहिलेली संपत्ती समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांच्या मूलभूत स्वरूपाच्या गरजा व्यवस्थितपणे भागविण्यासाठी वापरता येईल. श्रीमंतांनी आपल्या संपत्तीचा असंग्रह करून तिचा उपयोग गरजू व्यक्तींना सहाय्य करण्यास केला, तर श्रीमंतांबद्दल जनता-जनार्दनाच्या मनात आदराची भावना निर्माण होईल. असंग्रहामुळे श्रीमंत व्यक्तींची सामाजिक उपयुक्तता निश्चितपणे वाढेल आणि त्यांना समाजात आदराचे स्थान नक्कीच प्राप्त होईल. श्री साईबाबांच्या असंग्रह सिद्धांतामुळे संपत्तीचे, उत्पन्नाचे विकेंद्रीकरण शक्य होईल आणि यामुळे अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमतेची समस्यादेखील प्रभावीपणे नियंत्रित करता येईल. असंग्रह याचा अर्थ, संपत्ती निर्माणच करायची नाही, असा मात्र होत नाही. असंग्रह सिद्धांताचा स्वीकार केल्यावरही ही संपत्ती निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू राहते. परंतु, या प्रक्रियेचे शुद्धीकरण होते. असंग्रह करण्यासाठी संपत्ती निर्माण करायची असेल, तर ती निश्चितपणे चांगल्या मार्गांनीच निर्माण केली जाईल. असंग्रह करण्यासाठी वाममार्गाने, इतरांवर अन्याय करून कोणीही संपत्ती मिळविणार नाही. श्री साईबाबांच्या असंग्रह तत्त्वाचा स्वीकार करणारी व्यक्ती स्वतःला तिच्याकडे असणाऱ्या संपत्तीचा मालक न समजता विश्वस्त समजेल आणि या संपत्तीचा स्वतःसाठी वापर करून समाजाच्या फायद्यासाठी जास्तीत जास्त उपयोग









करील. भारतातील उद्योगपतींनी, जमीनदारांनी, व्यावसायिकांनी श्री साईबाबांच्या अ-संग्रह सिद्धांताचा स्वीकार केल्यास निश्चितपणे ती फारमोठी आर्थिक क्रांती ठरेल.

## विश्वासार्हता

श्री साईबाबांच्या सिद्धांतांमध्ये विश्वासार्हतेच्या सिद्धांतालादेखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. विश्वासार्हता म्हणजे, दिलेला शब्द पाळणे, विश्वासघात न करणे. विश्वासार्हता ही एकमेकांबद्दल आदराची, सन्मानाची भावना निर्माण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. श्री साईबाबा नेहमीच भक्तांना दिलेला शब्द पाळून आपली विश्वासार्हता सिद्ध करीत असत. श्री साईबाबांच्या विश्वासार्हतेच्या सिद्धांताचीदेखील आज संपूर्ण जगाला अत्यंत आवश्यकता आहे. केवळ विश्वासार्हतेच्या अभावामुळेच आज मानव एकमेकांकडे संशयाच्या नजरेने पहात आहे. आजच्या जगात सगळीकडे फसवेगिरी, प्रतारणा, लबाडी, विश्वासघात या अपप्रवृत्ती जोरात फैलावत आहेत. राजकारण असो वा अर्थिक व्यवहार विश्वासार्हता अत्यंत दुर्मिळ झाली आहे. विश्वासघात करण्याच्या वृत्तीमुळे असुरक्षितता निर्माण झाली आहे, माणसा-माणसातील दुरावा वाढत चालला आहे. विश्वासार्हतेच्या अभावामुळेच कर्मचारी, ग्राहक यांची फसवणूक सुरू आहे. विश्वासार्हतेच्या अभावामुळे निश्चितच सर्वांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे. आधुनिक व्यवस्थापनाच्या शास्त्राने विश्वासार्हतेचे महत्त्व ओळखलेले असून आता विश्वासार्हता हे अत्यंत महत्त्वाचे व्यावसायिक मूल्य समजले जात आहे. याचा अर्थ असा होतो की, श्री साईबाबांच्या विश्वासार्हतेच्या सिद्धांताला पर्याय नाही, हे सिद्ध झाले आहे. ग्राहक-उत्पादक, विद्यार्थी-शिक्षक, पती-पत्नी, कामगार-मालकवर्ग, जनता-राज्यकर्ते यांना सांधणारा विश्वासार्हता हा एकमेव दुवा आहे. विश्वासार्हता असेल तर विभिन्न धर्म, पंथ, भाषा, संस्कृती, तसेच राजकीय, आर्थिक, सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती एकत्र येऊन समाजाच्या उद्धारासाठी कार्य करू शकतात.

## मानवता

मानवता किंवा माणुसकी या श्री साईबाबांच्या उपदेश – खजिन्यातील एक अत्यंत अमूल्य असा दागिना आहे. श्री साईबाबांचा अवतार झाला होता, मानवाच्या कल्याणासाठी आणि म्हणूनच, साईसिद्धांतात मानवतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवता किंवा माणुसकी म्हणजे, माणसाने माणसाशी माणसासारखे वागणे. मानवता म्हणजे, मानवाच्या अस्मितेचे, प्रतिष्ठेचे संगोपन आणि संवर्धन करणे, मानवाला सन्मान मिळवून देणे. श्री साईबाबांनी मानवतेला इतके महत्त्व दिले होते की, ते महारोग वा कुष्ठरोग झालेल्या व्यक्तींना त्या काळी, जेव्हा सर्व समाज झिडकारीत होता, स्वीकारले होते. श्री साईबाबा स्वतः त्यांची सेवा-शुश्रूषा करीत असत. श्री साईबाबांचा मानवतावादी दृष्टिकोन वा सिद्धांत आज अत्यंत आवश्यक आहे. आज संपूर्ण विश्वात माणुसकीचा ऱ्हास अत्यंत वेगात होत आहे. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा सत्ता आणि संपत्ती मिळविण्यासाठी वापर करण्याच्या प्रयत्नात आहे. यामुळे माणसा-माणसात दुरावा निर्माण होत आहे. मानवतेच्या ऱ्हासामुळेच दहशतवाद, पिळवणूक, अत्याचार या समस्यांमध्ये







मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मानवतेच्या ऱ्हासामुळे जागतिक शांतता भंग होत असून तिसऱ्या महायुद्धाचा धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच, या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी श्री साईबाबांचा मानवतेचा सिद्धांत संपूर्ण जगाने स्वीकारणे आवश्यक आहे. प्रगत राष्ट्रांनी श्री साईबाबांचा मानवतेचा सिद्धांत स्वीकारला, तर मानवजातीचा मोठ्या प्रमाणात संहार करणाऱ्या अण्वस्त्रांची निर्मिती निश्चितपणे बंद होईल आणि अणुशक्तीचा उपयोग विघातक कृत्यांसाठी न करता विधायक कार्यासाठी केला जाईल. तसेच, प्रगत राष्ट्रांनी मानवता या तत्त्वाचा स्वीकार केल्यास जगातील गरीब राष्ट्रांकडे त्यांच्याकडून मदतीचा अधिक ओघ राहील.

## व्यवहारी दृष्टिकोन

श्री साईबाबांच्या ऐहिक स्वरूपाच्या वर्तणुकीचा अभ्यास केला असता, असे स्पष्ट दिसून येईल की, श्री साईबाबांनी व्यवहारीपणाला निश्चितपणे महत्त्व दिले होते. श्री साईबाबा त्यांना दैनंदिन उपयोगासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू योग्य ते दाम देऊन विकत घेत असत. ते कोणाकडूनही कोणतेही काम विनामूल्य करून घेत नसत. शिरडीतील वाण्यांकडून उधारीवर वस्तू घेतल्यास ते उधारी चुकती करीत असत. फळे आणि लाकडे विकत घेताना श्री साईबाबा घासाघीस करून योग्य तो भावच देत असत. या व्यवहारी दृष्टिकोनाच्या सिद्धांतामुळेच श्री साईबाबा आपल्या भक्तांना असा उपदेश करीत असत की, कर्ज काढून सणवार साजरे करू नका. श्री साईबाबांना अव्यवहारीपणाचे तोटे माहीत होते. केवळ अव्यवहारीपणामुळेच उधळपट्टी केली जाते. आर्थिक कार्याच्या नावाखाली अमाप संपत्ती उधळली जाते. या अव्यवहारीपणामुळेच आज चैनीच्या वस्तूंवरील खर्च सतत वाढत आहे. अव्यवहारीपणामुळेच बचत, काटकसर या अत्यंत आवश्यक बाबींकडे मानवाचे दुर्लक्ष होत आहे. अव्यवहारीपणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात आर्थिक अपव्यय करीत आहेत. अव्यवहारीपणामुळेच व्यसनपूर्तीवर पैशाची उधळपट्टी होत आहे. गिऱ्हाईकांच्या अव्यवहारीपणाचा गैरफायदा अनेक व्यापारी घेत असतात. म्हणूनच, प्रत्येक व्यक्तीने व्यवहारी दृष्टिकोन राखूनच आपला प्रपंच करायला हवा, हे व्यवहारज्ञान श्री साईबाबांनी दिले आहे. व्यवहारी दृष्टिकोन ठेवल्यास भारताच्या आयातीमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करणे सहज शक्य होईल. सध्या भारत देश सधन राष्ट्रांकडून आणि जागतिक संस्थांकडून घेतलेल्या कर्जांमुळे अगतिक झाला आहे. शासकीय पातळीवरील अव्यवहारीपणामुळे जनतेकडून करस्वरूपात जमा झालेल्या रकमेचा गैरवापर होत आहे. भारतातील शासन आणि प्रशासन व्यवस्थेने व्यवहारी दृष्टिकोन ठेवला, तर आंतरराष्ट्रीय कर्जरूपी पिंजऱ्यातून बाहेर येणे भारताला शक्य होईल.

## शुद्ध चारित्र्य

चारित्र्यहीनता ही गुन्हेगारीची जननी आहे आणि म्हणूनच, ज्या देशामध्ये चारित्र्यसंपन्न नागरिकांची वाणवा असते त्या देशाचे भवितव्य उज्ज्वल असणे शक्य नाही. काळाच्या ओघात संपूर्ण विश्वात उदात्त मानवी










मूल्यांचा, नैतिक मूल्यांचा फारच वेगात ऱ्हास होत आहे. श्री साईबाबा द्रष्टे असल्यामुळे त्यांनी त्यांच्या विचारधारेत, त्यांच्या तत्त्वप्रणालीत चारित्र्यसंपन्नतेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. आपल्या भक्तांचे चारित्र्य शंभर नंबरी सुवर्णाहूनही अधिक शुद्ध असेल याची ते नेहमीच दक्षता घेत असत. आपल्या भक्ताच्या मनात एखादा अनिष्ट विचार, कुविचार आला, तर श्री साईबाबा त्या भक्ताला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे योग्य तो सल्ला देऊन, योग्य ते मार्गदर्शन करून त्याच्या विचारांना चांगली दिशा प्राप्त करून देत असत. शुद्ध चारित्र्य असलेली व्यक्ती आपल्या देशबांधवांवर आणि इतरांवरदेखील अन्याय करू शकत नाही. अशी व्यक्ती देशविघातक कृत्यांमध्ये सहभागी होऊ शकत नाही. आज संपूर्ण विश्वाला एड्स या जीवघेण्या रोगाने ग्रासले आहे. या रोगाचा प्रसार होण्यामागील प्रमुख कारण म्हणजे, शुद्ध चारित्र्याचा अभाव वा व्यभिचार हाच आहे. भारताच्या राजकारणात चारित्र्यहीन व्यक्ती प्रबळ ठरू लागल्याने भारताची लोकशाही राज्यपद्धती अयशस्वी होऊ लागली आहे. निदान भविष्यकाळात तरी चारित्र्यसंपन्न व्यक्तींनी राजकारणात प्रवेश केला, तरच आपली लोकशाही खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्यव्यवस्था ठरणार आहे. शुद्ध चारित्र्य असलेल्या व्यक्तीच सध्या सर्वच क्षेत्रांत बोकाळलेल्या भ्रष्ट कारभाराचे शुद्धीकरण करू शकतील. याचा अर्थ असा होतो की, श्री साईबाबांच्या शुद्ध चारित्र्य सिद्धांताची कास धरणे ही संपूर्ण विश्वाची कायम स्वरूपाची गरज आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्य

श्री साईबाबा व्यक्तिस्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते. म्हणूनच, श्री साईबाबांनी आपली मते आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तींवर लादण्याचा कधीही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे प्रयत्न केला नाही. श्री साईबाबा आपल्या भक्तांना, त्यांनी विनंती केल्यास, त्यांच्या समस्यांवर सल्ला देत असत. परंतु, आपला सल्ला त्या भक्तांनी स्वीकारलाच पाहिजे, असा मात्र श्री साईबाबांचा आग्रह नसे. श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना कधीही एका विशिष्ट धर्माची तत्त्वे स्वीकारण्याचा, आचरणात आणण्याचा, ईश्वराच्या ठराविक अवताराचीच आराधना करण्याचा, एखादा विशिष्ट रोजगार वा व्यवसाय, उद्योग करण्याचा, आग्रह केला नाही. श्री साईबाबा आपल्या भक्तांना गीतेवरील, धर्मग्रंथावरील, तत्त्वज्ञानावरील स्वतःचे विचार, स्वतःचा अर्थ मांडण्याची संधी देत असत. कोणत्याही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि व्यक्तिविकासातून राष्ट्रविकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य अतिशय महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीकडे भिन्न भिन्न प्रकारच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक क्षमता असतात. या क्षमतांचा पूर्ण उपयोग करून व्यक्तीच्या, समाजाच्या, देशाच्या उन्नतीसाठी भरीव कामगिरी करण्यासाठी त्या व्यक्तीला आपल्या क्षमतांना योग्य वाव देण्याची, संधी देण्याची आवश्यकता असते. हुकूमशाहीद्वारे व्यक्तिस्वातंत्र्य चिरडले गेल्यामुळे अनेक गंभीर स्वरूपाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी झाल्यामुळे तयार झालेला असंतोष जनतेने हिंसक मार्गांनी व्यक्त केल्याची उदाहरणेदेखील अनेक आहेत. या पार्श्वभूमीवर





श्री साईबाबांचा व्यक्तिस्वातंत्र्याचा सिद्धांत निश्चितपणे अत्यंत उपयुक्त आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा सिद्धांत स्वीकारल्यास बालमजूर, स्त्रियांवरील अन्याय, वेठबिगार पद्धती इत्यादी समस्या निश्चितपणे नियंत्रणाखाली येऊ शकतात.

## श्रद्धा

श्री साईबाबांच्या मूलभूत सिद्धांतामध्ये श्रद्धेचे महत्त्व फारच महान आहे. श्री साईबाबांची अशी धारणा होती की, कोणत्याही कामात, ध्येयात यश मिळवायचे असेल, तर परिश्रम करायला हवेतच. परंतु, परिश्रमांचे, प्रयत्नांचे चांगले फळ मिळते, अशी श्रद्धा असलेली व्यक्तीच प्रत्यक्षात आवश्यक परिश्रम घेऊन आपले अंतिम उद्दिष्ट साध्य करू शकते. श्री साईबाबांच्या मते गुरुवर श्रद्धा असेल तरच ज्ञान प्राप्त होऊ शकेल. श्रद्धेचे महत्त्व आधुनिक विचारवंतांनी, मानसशास्त्रातील तज्ज्ञांनीदेखील मान्य केले आहे. महात्मा गांधींनी भारतीयांचे अहिंसक मार्गांनी जुलमी, अत्याचारी, आक्रमक, बलाढ्य इंग्रज राजवटीविरुद्ध आंदोलन उभे केले आणि स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले. हे केवळ अहिंसेवरील श्रद्धेमुळेच घडले. श्रद्धेमध्ये फार मोठी शक्ती आहे, हे साईबाबांनी जाणले होते आणि म्हणूनच, त्यांनी आपल्या भक्तांना श्रद्धेचा संदेश दिला. आज संपूर्ण विश्वात गुन्हेगारीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे आणि यामागील एक प्रमुख कारण अश्रद्धा हेदेखील आहे. ज्या व्यक्ती श्रद्धावान असतात त्या व्यक्तींची ईश्वरावर, सदाचारावर, सन्मार्गावर श्रद्धा असते. अशा व्यक्ती कधीही विघातक, गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये करू शकत नाहीत. श्रद्धा आत्मविश्वासाची जननी आहे आणि कोणालाही कामात, जबाबदारीत यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वासाची अत्यंत आवश्यकता असते. श्री साईबाबांनी त्यांच्या भक्तांना केवळ ईश्वरावर, गुरुवर, श्रमांवर श्रद्धा ठेवण्याचा सिद्धांत दिलेला नसून प्रत्येक माणसामध्ये असलेल्या गुणांवर, ईश्वरी अंशावर श्रद्धा ठेवण्यासही सांगितले आहे. खरोखर, माणसांनी माणसांवर श्रद्धा ठेवण्याचा साईबाबांचा संदेश हा निश्चितपणे संपूर्ण मानवजातीच्या विचारसरणीला नवी दिशा देणारा संदेश आहे, असे म्हणावे लागेल. दूषित पूर्वायुष्य असलेल्या, पापे केलेल्या व्यक्तींना श्री साईबाबा आपली चूक सुधारण्याची संधी देत. आज जगातील प्रत्येक देशातील न्यायसंस्था, गुन्हेगारांमध्ये काही चांगले गुणदेखील असू शकतात, हे तत्त्व स्वीकारून त्यांना आपली चूक सुधारून चांगल्या व्यक्ती बनण्याची संधी देतात. श्री साईबाबांच्या श्रद्धा सिद्धांताचाच हा आविष्कार आहे, असे विधान केल्यास चूक ठरणार नाही. श्रद्धेचा सिद्धांत आपल्या भक्तांसमोर आवर्जून मांडणारे श्री साईबाबा अंधश्रद्धेबाबत फारच जागरूक होते.

## सबुरी

श्री साईबाबांनी अत्यंत सुज्ञपणे आपल्या तत्त्वप्रणालीमध्ये सबुरीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. सबुरी म्हणजे, वाट पाहणे, प्रतीक्षा करणे. सबुरी सिद्धांताचा पुरस्कार करून साईबाबांनी सूचित केले आहे की, प्रत्येकाला आपल्या शुभ कर्मांचे मधुर फळ, आपल्या प्रयत्नांचे, प्रयासांचे यश हे मिळतेच; परंतु यश त्वरित मिळेल, याची शाश्वती देता येत नाही; त्यासाठी सबुरी ठेवावी लागते, प्रतीक्षा करावी लागते. सबुरी सिद्धांताद्वारे श्री साईबाबा आपल्या भक्तांना सांगू इच्छितात की, तुमचे ध्येय साध्य करून घेण्यासाठी तुम्हाला दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतील. आजच्या मानवाचा एक गंभीर दोष म्हणजे, त्याच्याकडे सबुरी नाही, यशप्राप्तीसाठी, आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी वाट पाहण्याची तयारी नाही. प्रत्येकाला लवकरात लवकर यश मिळविण्याची घाई झालेली आहे. यामुळे अनेक गैरप्रकार वाढत आहेत. प्रत्येक व्यक्तीला त्वरित श्रीमंत व्हायचे आहे. दीर्घकाळ प्रयत्न करीत राहण्याची कोणाचीही तयारी नाही. म्हणूनच, भ्रष्टाचार आणि इतर बेकायदेशीर व्यवहार वाढत आहेत. आज भारतासह संपूर्ण जगात आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींची संख्या फारच मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामागील प्रमुख कारण म्हणजे, सबुरी नसल्यामुळे अपयश येताच अनेक व्यक्ती पूर्णपणे खचतात, त्यांना प्रगतीचे मार्ग दिसत नाहीत, जगण्याची इच्छा नष्ट होते आणि अशा व्यक्ती आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. श्री साईबाबांचा सबुरीचा सिद्धांत

निश्चितपणे आत्महत्येची समस्या सोडविण्यास अत्यंत उपयुक्त आहे.

सबुरी या शब्दाचा अर्थ, धैर्य असादेखील होतो. प्रत्येक व्यक्तीवर आपल्या चुकांमुळे, इतरांच्या चुकांमुळे किंवा दैववशात संकटे येत असतात. संकटांवर मात करण्यासाठी आवश्यकता असते, ती त्यांना धैर्याने सामोरे जाण्याची. एकविसाव्या शतकातील मानवाला अनेक मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. म्हणूनच, प्रत्येकाने श्री साईबाबांच्या सबुरी सिद्धांताचा स्वीकार करणे, ही काळाची गरज आहे.

## आस्तिकता

श्री साईबाबांच्या तत्त्वज्ञानाने केवळ मानवाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासाला महत्त्व दिलेले नसून मानवाच्या आध्यात्मिक विकासालादेखील महत्त्व दिले आहे. श्री साईबाबांची भूमिका ही फारच व्यापक असल्यामुळे मानवाचा सर्वांगीण विकास हे श्री साईबाबांच्या सिद्धांतांचे अंतिम ध्येय आहे. म्हणूनच, त्यांनी आस्तिकतेला प्राधान्य दिले आहे. श्री साईबाबांनी ईश्वराचे अस्तित्वच नव्हे, तर ईश्वराचे वर्चस्वदेखील पूर्णपणे स्वीकारले आहे. ईश्वर म्हणजेच निराकार चैतन्य शक्ती आणि ही निराकार चैतन्य शक्ती साईसिद्धांतांचा गाभा आहे. श्री साईबाबा आपल्या सर्व भक्तांना सदैव ईश्वराशी अनुसंधान राखण्यास सांगत असत. पूजा-अर्चा, धर्मग्रंथांचे पठण इत्यादी मार्गांनी श्री साईबाबा आपल्या भक्तांना आस्तिकता तत्त्वाचे पालन करण्याचा आग्रह करीत असत. ईश्वराचे अस्तित्व मान्य केलेली व्यक्ती, ईश्वरभक्ती करणारी व्यक्ती प्रत्येक मानवामध्ये, प्राण्यामध्ये ईश्वराचा अंश आहे, असे मानते आणि म्हणूनच, अशी व्यक्ती मानवप्रेम, भूतदया या उदात्त तत्त्वांचे मनापासून पालन करते. आस्तिक व्यक्ती इतरांवर अन्याय करण्यास धजावत नाही. आस्तिक व्यक्तीच्या मनामध्ये कुविचारांचे वादळ निर्माण होऊ शकत नाही आणि यदा-कदाचित असे वादळ निर्माण झाले, तर ते मनातील ईश्वराच्या आराधनेने लगेचच शांत होते. आस्तिक व्यक्ती आपल्या संपत्तीचा, बुद्धीचा, ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठीच करीत असते. आस्तिकतेमुळे समाजात बंधुभावाचे वातावरण निर्माण होते, सहनशीलता वृद्धिंगत होते. आस्तिकतेमुळे आपल्यावर ओढवलेल्या विपरीत संकटामध्ये सहाय्य करण्यास ईश्वर तत्पर आहे, अशी भावना आस्तिक व्यक्तीच्या मनात निर्माण होते. या भावनेमुळे आत्मविश्वास वाढतो, प्रयत्न करण्यास हुरूप येतो आणि यशप्राप्ती सुलभ होते. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये फारच झपाट्याने प्रगती केली आहे. या प्रगतीमुळे निसर्गाच्या अनेक नियमांमध्ये दडलेले रहस्य उलगडू लागले आहे. मात्र, निसर्ग-नियमांच्या ज्ञानाचा, शास्त्रीय ज्ञानाचा विधायकपणे उपयोग करण्यासाठी-देखील आस्तिकतेची अत्यंत आवश्यकता आहे. आस्तिकतेमुळेच विज्ञान-तंत्रज्ञान शाप न ठरता वरदान ठरणार आहे.

श्री साईबाबांच्या सिद्धांतांचा खजिना खरोखरच अमर्याद असून या खजिन्यातील फारच थोडे माणिक-मोती साईभक्तांच्या चिंतनासाठी या लेखाद्वारे सादर केले आहेत. साईभक्तांनी श्री साईबाबांच्या देवभक्ती, निसर्गाशी जवळीकता इत्यादी सिद्धांतांचादेखील बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय संदर्भांशी सांगड घालून त्यांना आधुनिक रूप देणे आवश्यक आहे.

जगात आतापर्यंत अस्तित्वात आलेले विविध सिद्धांत प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन किंवा प्रशासनाच्या सहाय्याची प्रत्यक्ष सहभागाची आवश्यकता असते. परंतु, श्री साईबाबांचे सिद्धांत शासनाच्या वा प्रशासनाच्या मदतीशिवाय, केवळ अनुशासनाद्वारे, स्वयंनिर्णयांद्वारे, स्वयंनियंत्रणाद्वारे प्रत्यक्षात येऊ शकतात. साई-सिद्धांतांचा मूळ उद्देश हा समस्त मानवजातीचे कल्याण हाच आहे. साईसिद्धांत प्रत्यक्षात साकार करण्यासाठी राज्ययंत्रणेची, कायद्यांची, सरकारी नियमांची, कोणत्याही दबाव तंत्रांचा उपयोग करण्याची अजिबात आवश्यकता नाही. साईसिद्धांतांमध्ये स्वराज्य (स्वतःवरच राज्य करणे), अंत्योदय, विकेंद्रीकरण या सिद्धांतांचादेखील समावेश असल्यामुळे या सिद्धांतांना व्यक्त होण्यासाठी राज्यशक्तीची नव्हे, तर मनःशक्तीची, आत्मशक्तीची, भक्तिशक्तीची आवश्यकता आहे.

❑❑❑

श्रीरामचन्द्रं सततं नमामि।

# श्रीरामकथेचा देशविदेश संचार

- विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक, साईलीला)

**सुग्रीवमित्रं परमं पवित्रं सीताकलत्रं नवमेघगात्रम्।
कारुण्यपात्रं शतपत्रनेत्रं श्रीरामचन्द्रं सततं नमामि॥**

भगवान शिवशंकरांनी वरील शब्दात प्रभू रामचंद्रांची स्तुती गायलेली आहे. आनंद रामायणाच्या सारकांड भागात आपणास ही स्तुती विस्तारपूर्वक पहावयास मिळते. या स्तुतिपाठामध्ये भगवान शंकरांनी प्रभू रामचंद्रांचे 'संसार सारम्', 'धर्मावतारम्', 'सुखसिन्धुसारम्', 'सुरलोक-पालम्', 'विश्वप्रणामम्', 'वचनाभिरामम्' अशा अनेकानेक सुंदर - वैशिष्ट्यपूर्ण - आशयघन शब्दांनी वर्णन केलेले आहे. अनेक रामभक्तांना हे, स्तुतिस्तोत्र तोंडपाठ आहे. अनेकांच्या पूजापाठातील नित्यपठणाचे स्थान या स्तुतीस लाभलेले आहे. या स्तुतिस्तोत्रामध्ये एक अदृश्य शक्ती आहे की जिच्यामुळे भक्ताची भक्ती सफल सुफल होते.



भगवान शंकर जसे रामांची स्तुती करतात तद्वतच प्रभू रामचंद्र सागरतटी वाळूची पिंडी करून भगवान शिवशंकरांची आराधना करतात व लंका मोहिमेच्या यशाची कामना व्यक्त करतात. प्रभू रामचंद्र हा भगवान विष्णूंचा सातवा अवतार आहे. भगवान विष्णूंच्या १० अवतारांपैकी ७ वा श्रीराम व ८ वा श्रीकृष्ण हे दोन अवतार प्रमुख मानले जातात. ही गोष्ट लक्षात घेता शिवशंकरांनी रामस्तुती करणे व प्रभू रामचंद्रांनी शिवपूजा करणे हे एकाच ईशतत्त्वाची अनाकलनीय लीलाच आहे. ब्रह्मा-विष्णू-महेश या मुख्य त्रिदेवांपैकी विष्णूंनी, म्हणजेच रामांनी शिवशंकरांची पूजा करणे व शंकरांनी रामांची स्तुती गाणे यामागे फार मोठा आशय-संदेश आहे.

भारतात एकेकाळी शिवभक्त शैव आणि विष्णुभक्त 'वैष्णव' यांच्यात फार मोठा संघर्ष होता. हा संघर्ष किती मूर्खपणाचा होता हेच वरील गोष्टीतून व्यक्त होते. शिव व विष्णू हे एकमेकांची पूजा-स्तुती करून एकमेकांचा सन्मान-आदर करतात मग त्यांच्या भक्तांमध्ये संघर्ष कसा ? ब्रह्मा, शिव आणि विष्णू ही भलेही नावे वेगवेगळी आहेत पण त्या नावांमागे एकच परमसत्ता - ईशतत्त्व आहे. ही गोष्ट खऱ्या भक्ताला सांगावी लागत नाही. पण अनेकांना ती कळत नाही म्हणून आपल्या ऋषी-मुनींनी वरील लीला-कथा भक्तांमध्ये एकमेकांविषयी - एकमेकांच्या देवतांविषयी आदर निर्माण व्हावा या हेतूने लिहिलेल्या आहेत. डोळ्यांपुढे उत्तम आदर्श असेल तर माणूस उच्च ध्येय सहजपणे प्राप्त करू शकतो. श्रीरामांची मातृपितृ भक्ती - बंधुभाव; श्रीकृष्णाची कर्मनिष्ठा आणि शिवशंकर भगवानांची अपरिग्रही - वैराग्य वृत्ती ही गुणवैशिष्ट्ये सतत डोळ्यांपुढे ठेवण्याने, मनन-चिंतन करण्याने नकळत त्या आदर्शांमधील गुणांचे रोपण काही अंशरूपाने का होईना भक्तांच्या मनात होत असते. मोठमोठ्या समर्पित भक्तांची - साधकांची उदाहरणे डोळ्यांपुढे ठेवूनच प्रत्येक माणूस नराचा नारायण होऊ शकतो.

रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृतीचे प्राण आहेत. रामकथेचा महिमा अपार आहे. राम आणि कृष्ण हे आमच्या भारतीय एकतेचे - एकात्मतेचे प्रतीक आहेत. आज रामकथा अवघ्या विश्वात दुमदुमत आहे. भारतभूमीच्या व भारतीय भाषा - प्रांतांच्या सीमा पार करून रामकथेचा संचार सातासमुद्राच्या पलीकडे गेला आहे.

इंडोनेशियातील नागरिक आज धर्माने मुसलमान आहेत पण रामकथा - रामलीला त्यांच्या संस्कृतीचे अभिन्न अंग आहे. रामकथेचा असा देशविदेशांत प्रभाव आपणास दिसतो. रामकथा एकच पण ऋषी-मुनी, राजकारणी, अभ्यासक, भाविक भक्त यांना ती वेगवेगळ्या प्रकारे आकर्षक ठरलेली आहे. ऋषी-मुनींना मोक्षमुक्तीचे साधन म्हणून रामकथा महत्त्वाची वाटते. तर राममनोहर लोहिया, महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालवीय यांना रामकथा रामराज्यनिर्मितीचे प्रेरणा स्थान - एक सामाजिक नीतिकथा वाटते. महात्मा गांधींच्या जीवनात रामकथेला सर्वोपरी स्थान आहे. माझे जीवन रामकथेच्या संस्कारांनी घडलेले आहे असे त्यांनी आपल्या आत्मकथेत सविस्तरपणे व अत्यंत भावुकपणे लिहिलेले आहे. रामनाम हे गांधींना दिव्य औषधीसारखे वाटत होते. कोणत्याही रोगावर रामबाण औषध म्हणजे रामजप असे ते म्हणत.

रामनामाचा महिमा वर्णन करताना द्वारकापीठाधीश्वर शंकराचार्य श्री अभिनवसच्चिदानंद स्वामी महाराज म्हणतात - "**ॐ नमो नारायणाय**" हा अष्टाक्षर मंत्र आहे तर "**ॐ नमः शिवाय**" हा पंचाक्षर मंत्र आहे. "**ॐ नमो नारायणाय**" जपातून '**रा**' हे अक्षर आणि "**ॐ नमः शिवाय**" मंत्रातून '**म**' हे अक्षर मिळून '**राम**' नाम तयार झालेले आहे. त्यामुळे राम नामजपामध्ये वरील दोन्ही मंत्रजपाचे सामर्थ्य एकवटलेले आहे. 'रा' अक्षर उच्चारताना आपणास तोंड उघडावे लागते, दोन्ही ओठ एकमेकांपासून दूर जातात आणि त्याबरोबरच मनातील दुष्ट भाव - विकार बाहेर पडतात. तर 'म' उच्चार करताना ओठ बंद होतात. दुष्टतेला - विकार - वासनेला प्रवेशबंदी होते. 'राम' या शब्दाच्या उच्चाराचे, जपाचे हे वैशिष्ट्य आहे.

रामकथा हे भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे. कारण रामकथा भारताच्या सर्वच्या सर्व प्रांतांत व भाषांमध्ये आढळते. सुदूर उत्तर पूर्व राज्यांतील मणिपूर, आसाम, पूर्वेच्या बंगाल, ओरिसा, दक्षिणेतील केरळ, तामिळनाडू, आंध्र व कर्नाटक, उत्तरेतील पंजाबी, काश्मिरी, सिंधी, डोगरी, हिंदी, ऊर्दू, पश्चिमेतील मराठी, कोकणी, गुजराती, राजस्थानी आदि सर्व राज्यांत व सर्व प्रमुख भाषांमध्ये आपणास रामकथेचा संचार दिसून येतो. आमचे प्रांत वेगवेगळे आहेत, भाषा वेगवेगळ्या आहेत, राहणीमान व खानपान वेगवेगळे आहे पण आमचा आदर्श एक आहे. आमची संस्कृती एक आहे. रामकथा! हे आमचे एकात्मदर्शन आहे. स्थानिक भाषा व रीतीरिवाज यांमुळे रामकथेच्या त्या त्या भाषेतील रूपांमध्ये काही भिन्नता जरूर आहे पण त्या विविधतेतच आमची रामकथा ही एकता आहे.

भारतीय भाषांशिवाय नेपाळी, सिंहिली (लंका), ब्रह्मी (ब्रह्मदेश), चिनी, तिबेटी, जपानी, मलाया, थाई, कंबोडियाई, इंग्रजी, फ्रेंच आदि अनेक देशांच्या वेगवेगळ्या भाषांत रामकथेचा संचार आपणास आढळून येतो. त्याद्वारे भारताचा व भारतीय साहित्याचाही केव्हा व कसा प्रभाव देशविदेशांत पडलेला आहे ते दिसून येते.

रामकथेच्या प्रभावाची विविधता एवढी विलक्षण आहे की संतकवि, नाटककार यांनाही या कथेने मोहित केलेले आहे. पैकी अनेक कवींना 'रामकथाकार' म्हणूनच ओळखले जाते. रामकथाकारांची ही परंपरा फार मोठी आहे. आदिकवि वाल्मिकी, महर्षी व्यास, महाकवि कालिदास, महाकवि भवभूती, क्षेमेन्द्र, चन्दबरदाई, गोनबुद्ध, शारलादास, गोस्वामी तुलसीदास, संत एकनाथ महाराज, कवि मोरोपंत, केशवदास, रामानुजन्, कुमार वाल्मिकी, रहिमखान, रामपारशव, सेनापती, पद्माकर, भानुभक्त, गिरिधर अशी ही रामकथाकारांची प्रदीर्घ परंपरा रामप्रभूंएवढीच आम्हा भारतीयांना वंदनीय व प्रातःस्मरणीय आहे. यांच्या रामकथेतूनच आपल्या समाजाला वेळोवेळी प्रेरणा व स्फूर्ती लाभलेली आहे.

मराठीमध्ये संत एकनाथांनी 'भावार्थ रामायण' नावाचा प्रचंड ग्रंथ लिहून रामकथेचा 'श्रीगणेशा' केला. संत रामदासांनी रामकथा घरोघर नेली. कवि श्रीधर (नाझरेकर) यांच्या **रामविजयाने** पारायण सप्ताहाचे सोहळे सुरू झाले. आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकरांच्या 'गीत

रामायणा' ने मराठीमध्ये रामकथेला नवा बहर आला.

**काव्य नव्हे हा अमृतसंचय**
**गा बाळांनो तुम्ही रामायण**

हे सुधीर फडकेंच्या आवाजातील गीत जनमनात दरवळू लागले. आज त्या गोष्टीस ३०-३५ वर्षे झाली. पण गदिमा व सुधीरबाबूजींच्या गीतरामायणाचा गंध चैत्र महिना येताच मराठी मनाला रामभक्तीने धुंद करीत आहे. हा गदिमांच्या - सुधीरबाबूंच्या एवढाच मूळ रामकथेच्या प्रभावाचा विलक्षण परिणाम आहे. 'हरि अनंत, हरिकथा अनंत' तद्वतच **'राम अनंत, रामकथा अनंत'** आहे, अपार आहे.

रामकथेचा हा असा सर्वदूर संचार साईबाबा जाणत असावेत, म्हणूनच का त्यांनी रामनवमी उत्सव सुरू केला असावा ? श्री साईबाबा हे स्वतःच अवतार आहेत. ते स्वतःच राम आहेत. कृष्ण आहेत. त्यांनी रामरूपामध्ये काहीजणांना दर्शन दिले, असे आपण हेमाडपंतांच्या साईसच्चरित पोथीत वाचतो. ती बाबांची केवळ लीला नव्हे तर तेच त्यांचे खरे स्वरूप आहे. 'ईश्वर एक आहे, सबका मालिक एक' याचेच ते दर्शन आहे. साईबाबा हे स्वतःच अवतार असल्याने त्यांना रामनवमी आदि उत्सव साजरा करण्याची गरजच काय ? पण त्यांची ही लीला आपणा भक्तांसाठी. भक्तांना बोध देण्यासाठी. तुम्ही-आम्ही प्रभू रामचंद्रांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवावा व बंधुभावाचे मळे फुलवीत भक्तिपंथाच्या वाटेने माणुसकीच्या मंदिरावर प्रेमाचा कळस चढवावा यासाठी. चला तर, या नव्या दिशेने आपण रामनवमीचा पारंपारिक उत्सव आनंदाने साजरा करू या. जय श्रीराम ! जय जय साईराम !!

❑❑❑



## चला जाऊ शिरडीला नवमीच्या रामजन्माला



*चला जाऊ शिरडीला*
*नवमीच्या रामजन्माला*
*सत्यवचनी त्या पुरुषोत्तमाला*
*झोका देऊ या साईरामाला ॥धृ. ॥*
*तोचि राम धनुर्धारी*
*तोचि मशिदी अल्ला*
*एक सूर्य कोटी किरणे*
*सर्व रंग तेजाला*
*गजर करू या साईरामाचा*
*समभावाची गुंफूनि माला*
*चला जाऊ शिरडीला*
*नवमीच्या रामजन्माला ॥१ ॥*
*पालखी संगे साई डोले*
*म्हणोनि सारखी पालखी हाले*
*अगणित पाऊले साई चाले*
*घेवोनि देहाचे देव्हारे*
*भावसोहळा पुंडलिकाचा*
*साई-विठ्ठल दिंडीत रमला*
*चला जाऊ शिरडीला*
*नवमीच्या रामजन्माला ॥२ ॥*
*रुततील काटे दुखतील टाचा*
*वळू नका माघारी*
*शिरडीद्वारी स्वागता येईल*
*हात कृपेचा शिरी*
*जन्म-जन्माची खुंटेल वारी*
*मोक्ष मिळेल आगम-निगमाला*
*चला जाऊ शिरडीला*
*नवमीच्या रामजन्माला ॥३ ॥*

**- संजय परळकर**
दादर (प.), मुंबई.

# ।। श्री रामरक्षा स्तोत्रम् ।।

श्रीगणेशाय नमः । अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य ।
बुधकौशिकऋषिः । श्रीसीतारामचंद्रो देवता ।
अनुष्टुप् छंदः । सीता शक्तिः । श्रीमद्धनुमान्-
कीलकम् । श्रीरामचंद्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः ।

## ध्यानम्

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं
पीतं वासो वसानं
नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामाङ्कारूढसीता-
मुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं
नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं
रामचंद्रम् ।।
चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ।।१ ।।
ध्यात्वा नीलोत्पलश्यामं
रामं राजीवलोचनम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं
जटामुकुटमंडितम् ।।२ ।।
सासितूणधनुर्बाणपाणिं
नक्तंचरांतकम् ।
स्वलीलया जगत्त्रातुमा-
विर्भूतमजं विभुम् ।।३ ।।
रामरक्षां पठेत्प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ।।४।।
कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।।५ ।।
जिह्वां विद्यानिधिः
पातु कंठं भरतवंदितः ।
स्कंधौ दिव्यायुधः पातु
भुजौ भग्नेशकार्मुकः ।।६ ।।
करौ सीतापतिः पातु
हृदयं जामदग्न्यजित् ।
मध्यं पातु खरध्वंसी
नाभिं जांबवदाश्रयः ।।७ ।।

सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।८ ।।
जानुनी सेतुकृत्पातु जङ्घे दशमुखांतकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ।।९ ।।
एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ।।१० ।।
पाताल-भूतल- व्योम-
चारिणश्छद्मचारिणः ।



न द्रष्टुमपि शक्तास्ते
रक्षितं रामनामभिः ।।११ ।।
रामेति रामभद्रेति
रामचंद्रेति वा स्मरन् ।
नरो न लिप्यते
पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।।१२ ।।
जगज्जैत्रैकमंत्रेण रामनाम्नाभिरक्षितम् ।
यः कंठे धारयेत् तस्य करस्थाः
सर्वसिद्धयः ।।१३ ।।
वज्रपंजरनामेदं यो रामकवचं स्मरेत् ।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते
जयमङ्गलम् ।।१४ ।।
आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।
तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो
बुधकौशिकः ।।१५ ।।
आरामः कल्पवृक्षाणां
विरामः सकलापदां ।
अभिरामस्त्रिलोकानां
रामः श्रीमान् स नः प्रभुः ।।१६ ।।
तरुणौ रूपसंपन्नौ
सुकुमारौ महाबलौ ।
पुंडरीकविशालाक्षौ
चीरकृष्णाजिनाम्बरौ ।।१७ ।।
फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।।१८ ।।
शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् ।
रक्षःकुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ।।१९ ।।

आत्तसज्जधनुषाविषुस्पृशा-
वक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ ।
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रत:
पथि सदैव गच्छताम् ॥२०॥
सन्नद्ध: कवची खड्गी
चापबाणधरो युवा ।
गच्छन् मनोरथोऽस्माकं
राम: पातु सलक्ष्मण: ॥२१॥
रामो दाशरथि: शूरो
लक्ष्मणानुचरो बली ।
काकुत्स्थ: पुरूष: पूर्ण:
कौसल्येयो रघूत्तम: ॥२२॥
वेदान्तवेद्यो यज्ञेश: पुराणपुरुषोत्तम: ।
जानकीवल्लभ: श्रीमानप्रमेयपराक्रम: ॥२३॥
इत्येतानि जपेन्नित्यं
मद्भक्त: श्रद्धयान्वित: ।
अश्वमेधाधिकं पुण्यं
संप्राप्नोति न संशय: ॥२४॥
रामं दूर्वादलश्यामं
पद्माक्षं पीतवाससम् ।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न
ते संसारिणो नर: ॥२५॥
रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं
विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेंद्रं सत्यसंधं दशरथतनयं
श्यामलं शांतमूर्तिम् ।
वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं
राघवं रावणारिम् ॥२६॥
रामाय रामभद्राय
रामचंद्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय
सीताया: पतये नम: ॥२७॥
श्रीराम राम रघुनंदन राम राम
श्रीराम राम भरताग्रज राम राम ।
श्रीराम राम रणकर्कश राम राम
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥२८॥



श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि
श्रीरामचंद्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि
श्रीरामचंद्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥२९॥
माता रामो मत्पिता रामचंद्र:
स्वामी रामो मत्सखा रामचंद्र: ।
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुर्-
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥३०॥
दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।
पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनंदनम् ॥३१॥
लोकाभिरामं रणरङ्गधीरं
राजीवनेत्रं रघुवंशनाथम् ।
कारुण्यरूपं करुणाकरं तं
श्रीरामचंद्रं शरणं प्रपद्ये ॥३२॥
मनोजवं मारुततुल्यवेगं
जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥३३॥
कूजन्तं रामरामेति
मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां
वंदे वाल्मीकिकोकिलम् ॥३४॥
आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो
नमाम्यहम् ॥३५॥
भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् ।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥३६॥
रामो राजमणि: सदा विजयते
रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू
रामाय तस्मै नम: ॥
रामान्नास्ति परायणं परतरं
रामस्य दासोऽस्म्यहम् ।
रामे चित्तलय: सदा भवतु मे
भो राम मामुद्धर ॥३७॥
राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्रनामतत्तुल्यं रामनाम वरानने ॥३८॥

❑❑❑

# ।। श्री साईनाथमहिम्न स्तोत्रम् ।।

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं,
जगत्संभवस्थानसंहारहेतुम् ।
स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयंतं,
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम् ।।१ ।।
भवध्वांतविध्वंसमार्तंडमीड्यं,
मनोवाग्गतीतं मुनीर्ध्यानगम्यम् ।
जगत्व्यापकं निर्मलं निर्गुणं त्वां, नमामी० ।।२ ।।
भवांभोधिमग्नार्दितानां जनानां,
स्वपादाश्रितानां स्वभक्तिप्रियाणाम् ।
समुद्धारणार्थं कलौ संभवंतं, नमामी० ।।३ ।।
सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात्सुधास्त्राविणं
तिक्तमप्यप्रियं तम् ।
तरुं कल्पवृक्षाधिकं साधयंतं, नमामी० ।।४ ।।
सदा कल्पवृक्षस्य तस्याधिमूले
भवेद्भावबुद्ध्या सपर्यादिसेवाम् ।
नृणां कुर्वतां भुक्तिमुक्तिप्रदं तं, नमामी० ।।५ ।।
अनेकाश्रुतातर्क्यलीलाविलासैः,
समाविष्कृतेशानभास्वत्प्रभावम् ।
अहंभावहीनं प्रसन्नात्मभावं, नमामी० ।।६ ।।
सतां विश्रामाराममेवाभिरामं सदा सज्जनैः
संस्तुतं सन्नमद्भिः । जनामोददं
भक्तभद्रप्रदं तं, नमामी० ।।७ ।।
अजन्माद्यमेकं परं ब्रह्म साक्षात्स्वयं
संभवं राममेवावतीर्णम् ।
भवदर्शनात्संपुनीतः प्रभोऽहं, नमामी० ।।८ ।।
श्रीसाईशकृपानिधेऽखिलनृणां सर्वार्थसिद्धिप्रद ।
युष्मत्पादरजःप्रभावमतुलं धातापि वक्ताऽक्षमः ।।
सद्भक्त्या शरणं कृतांजलिपुटः
संप्राप्तितोऽस्मि प्रभो,



श्रीमत्साईपरेशपादकमलान्नान्यच्छरण्यं मम ।।९ ।।
साईरूपधरराघवोत्तमं,
भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम् ।
माययोपहतचित्तशुद्धये,
चिंतयाम्यहमहर्निशं-मुदा ।।१०।।
शरत्सुधांशुप्रतिमप्रकाशं, कृपातपत्रं तव साईनाथ ।
त्वदीयपादाब्जसमाश्रितानां स्वच्छायया
तापमपाकरोतु ।।११।।
उपासनादैवतसाईनाथ,
स्तवैर्मयोपासनिना स्तुतस्त्वम् ।
रमेन्मनो मे तव पादयुग्मे,
भृङ्गो, यथाब्जे मकरंदलुब्धः ।।१२ ।।
अनेकजन्मार्जितपापसंक्षयो,
भवेद्भवत्पादसरोजदर्शनात् ।
क्षमस्व सर्वानपराधपूंजकान्प्रसीद
साईश गुरो दयानिधे ।।१३ ।।
श्रीसाईनाथचरणामृतपूतचित्तास्तत्पाद
सेवनरताः सततं च भक्त्या ।
संसारजन्यदुरितौघविनिर्गतास्ते कैवल्यधाम
परमं समवाप्नुवन्ति ।।१४ ।।
स्तोत्रमेतत्पठेद्भक्त्या यो नरस्तन्मनाः सदा ।
सद्गुरुसाईनाथस्य कृपापात्रं भवेद् ध्रुवम् ।।१५ ।।
साईनाथकृपास्वेद्रुसत्पद्यकुसुमावलिः ।
श्रेयसे च मनःशुध्यै प्रेमसूत्रेण गुंफिता ।।१६ ।।
गोविंदसूरिपुत्रेण काशीनाथाभिधायिना ।
उपासनीत्युपाख्येन श्रीसाईगुरवेऽर्पिता ।।१७ ।।

इति श्री साईनाथमहिम्न स्तोत्रम् संपूर्णम् ।।

□□□

# ॥ साई उवाच ॥

## अध्याय ३९ वा

संग्राहक : प्र. का. सोमण
(निवृत्त ले. कर्नल)

(मागील अंकावरून पुढे)

पार्श्वभमी :

एकदा नानासाहेब चांदोरकर बाबांची (पाय चेपण्याची) सेवा करीत असताना, तोंडाने गीतेच्या चौथ्या अध्यायातील काही श्लोक गुणगुणत होते. ते ऐकून बाबांच्या मनात आले की, नानासाहेबांना त्या अध्यायातील ३४ व्या श्लोकाचा अर्थ नीट समजावून द्यावा. ज्ञानकर्मसंन्यासन। ब्रह्मार्पणयोगाध्यायाचें पठण। नानांची ती अस्पष्ट गुणगुण। केली कीं कारण (बाबांच्या) प्रश्नास ॥३३॥ "सर्वं कर्माखिलं पार्थ" म्हणत नानांनी ३३ वा श्लोक संपविला व "तद्विद्धि प्रणिपात" म्हणत चौतिसावा श्लोक ते पुटपुटू लागले. बाबा म्हणाले :- "नाना काय गुणगुणसी। म्हण रे स्पष्ट हळू जें म्हणसी। येऊं दे कीं ऐकूं मजसी। पुटपुटसी जे गालांत" ॥३६॥


(नानासाहेबांना बाबांच्या प्रश्नाचे फार आश्चर्य वाटले; कारण त्यांना वाटले, बाबांनी संस्कृतचे अध्ययन कधी केले, त्यांनी गीता कधी वाचली, गीतेचा सर्वार्थ माहीत असल्यागत त्यांनी हा प्रश्न केला आहे.)

पुढे साईंनी या श्लोकाचा गूढार्थ नानासाहेबांना समजावून सांगितला :-

"नाना तृतीय चरण। पुनश्च लक्षांत घेई पूर्ण। 'ज्ञान' शब्दामागील जाण। अवग्रह आण अर्थास ॥५४॥ हें मी काय वदें विपरीत। अर्थाचा काय करितों अनर्थ। असत्य काय पूर्वील भाष्यार्थ। ऐसेंही निरर्थ ना मानीं ॥५॥ ज्ञानी आणि तत्त्वदर्शी। ज्ञान उपदेशिती ऐसें जें म्हणसी। तेथें अज्ञान पद जैं घेसी। यथार्थ घेसील प्रबोध ॥५६॥ ज्ञान नव्हे बोलाचा विषय। कैसें होईल तें उपदेश्य। म्हणोनि ज्ञान शब्दाचा विपर्यय। करीं मग प्रत्यय अनुभवीं ॥५७॥ परिसिला तुझा ज्ञान-पदार्थ। अज्ञान घेतां काय रे वेंचत। 'अज्ञान' वाणीचा विषय होत। ज्ञान हें शब्दातीत स्वयें ॥५८॥ वार वेष्टी गर्भासी। अथवा मल आदर्शासी। विभूति आच्छादी वन्हीसी। तैसेंच ज्ञानासी अज्ञान ॥५९॥ अज्ञानानें आवृत ज्ञान। केलें या गीतीं भगवंतें कथन। एतदर्थ होतां अज्ञाननिरसन। स्वभावें ज्ञान प्रकाशे ॥६०॥ ज्ञान हें तों स्वतःसिद्ध। शैवालावृत तोयसें शुद्ध। हें शैवाल जो सारील प्रबुद्ध। तो जल विशुद्ध लाधेल ॥६१॥ जैसें चंद्रसूर्याचें ग्रहण। ते तों सर्वदा प्रकाशमान। राहू केतु आड येऊन। आमुचे नयन अवरोधिती ॥६२॥ चंद्रसूर्यां नाहीं बाध। हा तों आमुचे दृष्टीस अवरोध। तैसें ज्ञान असे निर्बाध। स्वयंसिद्ध स्वस्थानीं ॥६३॥ डोळा करी अवलोकन। तयाची देखणी शक्ति तें ज्ञान। वरी पडळ वाढे तें अज्ञान। तयाचें निरसन आवश्यक ॥६४॥ तें पडळ अथवा सारा। हस्तकौशल्यें दूर सारा। देखणी शक्ति प्रकट करा। अज्ञानतिमिरा झाडोनि ॥६५॥ पहा हें सकल दृश्यजात। अनिर्वचनीय मायाविजृंभित। हीच अनादि अविद्या अव्यक्त। अज्ञानविलसित तें हेंच ॥६६॥ ज्ञान ही वस्तु जाणावयाची। नव्हे ती विषय उपदेशाची। प्रणिपात परिप्रश्न सेवा हींचि। गुरुकृपेचीं साधनें ॥६७॥ विश्वाचें सत्यत्व महाभ्रम। हेंचि ज्ञानावरण तम। निरसूनि जावें लागे प्रथम। प्रज्ञान ब्रह्म प्रकटे तैं ॥६८॥ संसारबीज जें अज्ञान। डोळां पडतां गुरुकृपांजन। उडे मायेचें आवरण। उरे तें ज्ञान स्वाभाविक ॥६९॥ ज्ञान हें तों नव्हे साध्य। तें तों आधींच स्वयंसिद्ध। हें तों आगमनिगमप्रसिद्ध। अज्ञान हा विरोध ज्ञानाला ॥७०॥ देवां भक्तां जें भिन्नपण। हेंच मूळ अज्ञान विलक्षण। तया अज्ञानाचें निरसन। होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥७१॥ दोरापोटीं सर्पा जनन। हें तों शुद्धस्वरूपाज्ञान। स्वरूपोपदेशें निरसे अज्ञान। उरे तें ज्ञान दोराचें ॥७२॥ पोटीं सुवर्ण वरी काट। काटापोटीं लखलखाट। परी तो व्हावयालागीं प्रकट। हव्यवाटचि आवश्यक ॥७३॥ मायामूळ देहजनन। अदृष्टाधीन देहाचें चलन। द्वंद्वें सर्व अदृष्टाधीन। देहाभिमान अज्ञान ॥७४॥ म्हणोनि जे स्वयें



निरभिमान। तयां न सुखदुःखाचें भान। विरे जैं अहंकाराचें स्फुरण। तैंच अज्ञाननिरास ॥७५॥ स्वस्वरूपाचें अज्ञान। तेंच मायेचें जन्मस्थान। होतां गुरुकृपा मायानिरसन। स्वरूपज्ञान स्वभावें ॥७६॥ एका भगवद्भक्तीवीण। किमर्थ इतर साधनीं शीण। ब्रह्मदेवही मायेअधीन। भक्तीच सोडवण तयाही ॥७७॥ हो कां ब्रह्मसदनप्राप्ति। भक्तवांचूनि नाहीं मुक्ति। तेथेंही चुकल्या भगवद्भक्ति। पडे तो पुनरावृत्तींत ॥७८॥ तरी व्हावया मायानिरसन। उपाय एक भगवद्भजन। भगवद्भक्ता नाहीं पतन। भवबंधनही नाहीं तया ॥७९॥ जन म्हणती माया लटकी। परी ती आहे महाचेटकी। ज्ञानियां फसवी घटकोघटकीं। भक्त नाचविती चुटकीवरी ॥८०॥ जेथें ठकती ज्ञानसंपन्न। तेथे टिकती भाविकजन। कीं ते नित्य हरिचरणीं प्रपन्न। ज्ञानाभिमानधन ज्ञानी ॥८१॥ म्हणोनि व्हावया मायातरण। धरावे एक सद्गुरुचरण। रिघावें तया अनन्य-शरण। भवभयहरण तात्काळ ॥८२॥ अवश्य येणार येवो मरण। परी न हरिचें पडो विस्मरण। इंद्रियीं आश्रमवर्णाचरण। चित्तें हरिचरण चिंतावे ॥८३॥ रथ जैसा जुंपल्या हयीं। तैसेंच हें शरीर इंद्रियीं। मनाच्या दृढ प्रग्रहीं। बुद्धि निग्रही निजहस्तें ॥८४॥ मन संकल्पविकल्पभरीं। धांवे यथेष्ट स्वेच्छाविहारी। बुद्धि त्या निजनिश्चयें निवारी। लगाम आवरी निजसत्ता ॥८५॥ बुद्धिसारिखा कुशल नेता। ऐसा सारथी रथीं असतां। रथस्वामींसी काय चिंता। स्वस्थ चित्ता व्यवहरे ॥८६॥ देहगत सकल कार्य। हें बुद्धिचें निजकर्तव्य। ऐसी मनासी लागतां संवय। सर्व व्यवसाय हितमय ॥८७॥ शब्दस्पर्शरूपादि विषय। येणें मार्गें लागल्या इंद्रिय। होईल व्यर्थ शक्तिक्षय। पतनभय पदोपदीं ॥८८॥ शब्दस्पर्शरूपादिक। पंचविषयीं जें जें सुख। तें तें अंतीं सकळ असुख। परम दुःख अज्ञान ॥८९॥ शब्दविषया भुले हरिण। अंतीं वेंची आपुला प्राण। स्पर्शविषया सेवी वारण। साहे आकर्षण अंकुशें ॥९०॥ रूपविषया भुले पतंग। जाळूनि निमे आपुलें अंग। मीन भोगी रसविषयभोग। मुके सवेग प्राणास ॥९१॥ गंधालागीं होऊनि गुंग। कमलकोशीं पडे भृंग। एकेका पायीं इतुका प्रसंग। पांचांचा संघ भयंकर ॥९२॥ हीं तों स्थावर जलचर पंखी। ययांची दुस्थिती देखोदेखी। ज्ञाते मानवही विषयोन्मुखी। अज्ञान आणखी तें काय ॥९३॥ अज्ञाननाशें विषयविन्मुख। होतां, होईल उन्मनीं हरिख। जीव ज्ञानस्वरूपोन्मुख। आत्यंतिक सुख लाधेल ॥९४॥ चित्तें करा हरिगुरुचिंतन। श्रवणें करा चरित्रश्रवण। मनें करा ध्यानानुसंधान। नामस्मरण जिव्हेनें ॥९५॥ चरणीं हरिगुरुग्रामागमन। घ्राणीं तन्निर्माल्याघ्राणन। हस्तीं वंदा तयाचे चरण। डोळां घ्या दर्शन तयाचें ॥९६॥ ऐशा या सकल इंद्रियवृत्ति। तयाकारणें लावितां प्रीति। धन्य तया भक्तांची स्थिति। भगवद्भक्ति काय दुजी ॥९७॥ सारांश समूळ अज्ञान खाणा। उरे तें ज्ञान सिद्ध जाणा। ऐसें या श्लोकाचें हृद्गत अर्जुना। श्रीकृष्णराणा सूचवी" ॥९८॥ (आधींच नाना विनयसंपन्न। परिसूनि गोड हें निरूपण। पायीं घालूनि लोटांगण। वंदिले चरण दों हातीं ॥९९॥ मग ते श्रद्धानिष्ठ प्रार्थना। करिती दवडा मम अज्ञाना। दंडा माझिया दुरभिमाना। यथार्थ शासना करोनि ॥१००॥ सात्त्विकतेची हौस वरिवरी। विकल्प अखंड दाटे अंतरीं। अपमान साहेना क्षणभरी। अज्ञान तें तरी काय दुजें ॥१०१॥ पोटीं प्रतिष्ठेची उजरी। ध्यानाविर्भाव दावी वरी। कामक्रोध धुमसे भीतरीं।



पार्श्वभूमी :

**बा**बांनी (गर्भश्रीमंत) बापूसाहेब बुट्टी व त्यांचा लाडका शामा यांच्या स्वप्नांत एकाच रात्री एकाच वेळी जाऊन एकच आदेश दोघांनाही दिला. बाबांनी बुट्टींना **''आपणही आपुला वाडा निश्चितीं। देउळासमवेती बांधावा''** हा दृष्टांत दिला व तोच दृष्टांत बाबांनी शामालाही दिला. रात्री स्वप्नात शामाला बाबा दिसले म्हणून तो प्रेमाश्रूंनी मोठ्याने रडत होता. बापूसाहेबांना शामाने हे स्वप्न जाग आल्यावर सांगितले. दोघांना एकाच वेळी एकच स्वप्न पडलेले पाहून बुट्टींना मोठा विस्मय वाटला. मग ते दोघे काकासाहेब दीक्षितांसहित बाबांकडे गेले. शामा बाबांना म्हणतो, देवा हा खेळ काय आहे तुझा अकळ। झोंपही न घेऊं देसी निश्चळ। तेथेंही आम्हां तें बरळविसी ॥१४२॥ हे शामाचे बोलणे ऐकून बाबा म्हणाले :-

**''आम्ही आपुले ठिकाणीं।**
**म्हणोत कोणी कांहींही'' ॥१४३॥**
(मग ती पूर्वोक्त योजना।
मांडिली बाबांचिया अनुमोदना।
जाहली तात्काळ बाबांची अनुज्ञा।
समंदिर सदना बांधावया ॥१४४॥
माधवरावांनीं बांधिली कंबर।
झाला तळमजला तळघर।
त्यांचेच हातून झाली विहीर।
काम हें येथवर पोहोंचलें ॥१४५॥

त्यावेळी बापूसाहेबांना अचानक एक कल्पना सुचली की, मध्यभागी चौक करून तेथे सिंहासन बांधावे व वर मुरलीधराची मूर्ती बसवावी. शामाने बाबांची अनुमती विचारली तेव्हा आनंदाने बरे म्हणून बाबा म्हणाले :-

**''देऊळ पूर्ण झालियावरती।**
**येऊं कीं वस्तीस आपणही'' ॥१५९॥**
तसेच बाबा पुढे म्हणाले :-
**''वाडा पुरा झालियापाठीं।**
**आपुलेसाठींच तो लावूं ॥१६०॥**
**तेथेंच आपण बोलूं चालूं।**
**तेथेंच आपण अवघे खेळूं।**
**प्रेमें आपापणा कवटाळूं।**
**भोगूं सुकाळू आनंदाचा'' ॥१६१॥**

(हे बाबांचे बोल ऐकून, शामाने लगेच त्यांना विचारले, ''पाया खोदण्यासाठी ही वेळ चांगली आहे ना ? नारळ फोडू ना ?'' तेव्हा बाबा म्हणाले :-)

**''फोड फोड''** म्हणतां तात्काळ।
आणूनि श्रीफळ फोडिलें।
त्यावर एकदा बाबा म्हणाले :-
**''मजला वाड्यांत द्या ठेवून''**
(हें अंतकाळींचें बाबांचें वचन।
निघतां बाबांचिया मुखांतून।
जाहलें निश्चिंत मन सर्वांचें ॥१७०॥
मग तें पवित्र साईशरीर।
जाहलें गाभारियामाजी स्थिर।
वाडा जाहला समाधिमंदिर।
अगाध चरित्र साईचें ॥१७१॥
धन्य भाग्य त्या बुट्टींचें।
जयांचिये गृहीं स्वसत्तेचें।
विसांवे शरीर श्रीसाईचें।
नाम जयांचें अतिपावन ॥१७२॥)

मुरलीधराच्या मूर्तीऐवजी हा साक्षात् मुरलीधर समाधीनंतर तेथे कायमचा स्थिरावला ! केवढे मोठे हे बुट्टींचे भाग्य !!

**॥ अध्याय ३९वा समाप्त ॥**

# ॥ गुणियांचा गुणिया साईराजा ॥

- साईसेविका

श्री साईसच्चरितात हेमाडपंतांनी साईबाबांचे अनेक तऱ्हेने गुणगान केले आहे. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची उधळण केली आहे. एवढेच नव्हे तर, ''गुणियांचा गुणिया गुणिराजा'' या विशेषणांनी साईबाबांचा गुणगौरव केला आहे. संपूर्ण साईचरित्रात साईबाबांच्या गुणफुलांचा सुगंधी परिमळ दरवळतो. आपण जाणीवपूर्वक लक्ष देऊन सुगंध हुंगला तर मोहित होतो व साईबाबांच्या अनेक गुणांचे पैलू आपल्याला आकर्षित करतात. तर, असे हे साईबाबांचे सगुण रूप, तसेच त्यांचे गुणवैभव व निर्गुण रूप समजून घेऊ या.

सर्वप्रथम साईबाबांना राजाधिराज चक्रवर्ती सम्राट म्हणून गौरविले आहे. त्यांच्या हृदयसिंहासनाचे, त्यांच्या दरबाराचे सुरेख गुणगान गाऊन आपल्यासमोर साईदरबाराचा थाट, वैभवशाली शब्दरूपांत उभा केला आहे. हेमाडपंत म्हणतात :-

साईबाबा हे राजाधिराज चक्रवर्तीप्रमाणे आहेत. त्यांच्या हृदयसिंहासनावर शांती विराजमान झालेली आहे. ते स्वानंदाचे साम्राज्यपती आहेत. त्यांना भेदाभेद स्थिती नाही. त्यांची सहजप्रवृत्ती, म्हणजेच समभाव स्थिती, ही त्यांच्या दोन्ही बाजूंनी चवऱ्या ढाळीत आहे, त्यांची स्वात्मस्थिती त्यांच्यावर छत्र धरून आहे, तर त्यांच्या अंगी असलेली शांतस्थिती वेत्रधारीप्रमाणे (वेतधारी सेवका-प्रमाणे) आहे. त्यांच्यासमोर षड्रिपू व माया एक क्षणभरही उभे राहू शकत नाहीत. त्यांच्या दरबारात चार वेद, षड्गुण व अठरा पुराणे हे सर्वजण स्तुतिस्तोत्र गाणाऱ्या भाटाप्रमाणे त्यांचे गुणगान करीत आहेत. त्यांची आनंदी वृत्ती चिन्मय चंद्राच्या लखलखाटाने चमकत आहे. त्यामुळे त्यांच्यासभोवती घनदाट आनंद पसरला आहे. त्यांच्या सेवेला विरक्ती, भक्ती, शुद्ध ज्ञान, श्रवण, मनन, निदिध्यासन, निजानुसंधान हे अष्टप्रधान म्हणून सेवारत असतात. शांती व दांती हे दोन दिव्य मणी त्यांच्या कंठात शोभून दिसतात. साईबाबा वेदांताचे सागर असून त्यातून निघालेले सुधामृत म्हणजे त्यांची मधुर वाणी आहे. त्यांच्या शब्दाला सतेज धार आहे. ज्ञानाचे खड्ग त्यांनी उपसले, तर भववृक्ष त्यांच्यासमोर थरथर कापतात.

सर्वसामान्य प्रापंचिक भक्तांसाठी साईबाबांनी सगुण रूप धारण केलेले आहे. ते त्यांचे सगुण रूप कसे आहे ते पाहू या.

साईबाबांचे सगुण गोरे-गोमटे रूप पाहून कंठ आनंदाने भरून येतो, डोळ्यांतून आनंदाश्रू पाझरू लागतात, हृदयात अष्टभाव दाटून येतात, भक्तांचा सोऽहं भाव जागृत होतो व भक्त निजानंदात रंगून जातात. साईदर्शनाने भक्तांची भेदाभेद वृत्ती जिरवून टाकण्यास मदत होते. भक्तांना अद्वैत स्थिती प्राप्त करण्यास साईबाबा मदत करतात. साईबाबा सच्चिदानंदी असल्याने दुःखाचे निर्मूलन करून सौख्यावस्था निर्माण करतात. ते भक्तांचा अहंकार, दर्प यांचा लोप करतात. साधू-सज्जनांचे रक्षण व असाधूंचे समूळ निर्दालन करण्यासाठी त्यांनी सगुण रूप घेतलेले आहे. लहान-मोठा, साधू-असाधू असा पक्षपात त्यांच्याजवळ नाही; तर सर्वांशी समान वागणूक आहे. गरीब, दीन-दुबळे यांच्या उद्धारासाठी त्यांचे दयाशील मन तीळतीळ तुटते, प्रेमाने ओथंबून येते. जणुकाही साईबाबा भवसागर प्राशन करण्यासाठी 'अगस्ती' ऋषीप्रमाणे सगुण रूप घेऊन अवतरले आहेत. ते भक्तांचा अज्ञानरूपी अंधःकार दूर करणारे ज्ञानभास्कर बनले आहेत. साईबाबांचे मूर्त स्वरूप पाहून वाटते की, भक्तांचे रक्षण, उद्धरण करण्याकरिता मूर्तिमंत ज्ञानराजा कैवल्याचे तेज बनून अवतीर्ण झाला आहे. सर्व जीवमात्री अत्यंत ममता, तसेच इतरत्र अनासक्तता, विरक्तता व निर्वैरता, त्याचबरोबर समता त्यांच्याठायी आहे. त्यांच्याठायी शत्रू-मित्र, रंक-राव हा भाव नाही. असा हा महानुभावाचा सगुण अवतार म्हणजे श्री साईबाबा होय !

साईबाबा सदोदित आत्मानंदात रमलेले असतात. त्यांची वृत्ती सुख-दुःखातीत आहे. भक्तांच्या गौरवासाठी

त्यांनी सत्‌चित् सुखाची मूर्ती धारण केलेली आहे. संपूर्ण ब्रह्मज्ञानाने युक्त असे मूर्तरूप त्यांनी स्वीकारले आहे. त्यांची प्रपंच-निवृत्ती व निःष्प्रपंच अशी ब्रह्मात्म्यैक स्थिती भाविक भक्तांना ''आनंदो ब्रह्मेति'' अशी श्रुतीतील अवस्था प्राप्त करून देते. सर्वसामान्य संसारी देहबुद्धीत असणाऱ्या भक्तांसाठी, त्यांना सगुण भक्तीतून निर्गुण भक्तीकडे वळवून आत्मज्ञानी करण्यासाठी साईबाबांचे प्रयत्न असतात. तेच त्यांचे अवतारकार्य. म्हणूनच, भक्तांच्या इच्छेखातर, त्यांचा भक्तिभाव ओळखून सर्व तऱ्हेचे पूजा-उपचार ते करवून घेतात. साईबाबा शांतीप्रिय, उदार व ज्ञानाचे भांडार आहेत. त्यांची वृत्ती सदोदित आत्मस्वरूपी दंग, नश्वराकडे दुर्लक्ष, निर्मळ अंतरंग, समभावी व भूतमात्री भगवंत पाहणारी आहे. मुखी सदोदित अल्लाचे नाव, मित; पण मार्मिक बोल, हाती भिक्षापात्र, अंगी अतिलीनता व निरभिमानी असे त्यांचे गुण आहेत.

आता, साईबाबांचे निर्गुण स्वरूप कसे आहे ते पाहू. हेमाडपंत म्हणतात :- साईबाबांचे मूळ निर्गुण स्वरूप निर्विकारी, निःसंग, निर्मुक्त व निरिच्छ आहे. साईबाबा हे नाशरहित असे ब्रह्माचे सत्य, चिरकाल टिकणारे स्वरूप आहे. त्यांचे मायेवर पूर्णतः नियंत्रण असते. ते अनादि काळापासून अनंतापर्यंत शक्तिरूपाने चिरकाल टिकणारे आहेत. ते भेदातीत, मरणातीत आहेत. साईबाबा अत्यंत सूक्ष्माहून सूक्ष्म अशा स्वरूपात वावरतात, तसेच महंताहूनही अत्यंत महंत असे, विशाल ब्रह्मांड व्यापूनही बाकी शक्तिरूपाने शिल्लक, अगदी जसेच्या तसे आहेत. त्यांचे निर्गुण रूप दृश्य स्वरूपात नाही; परंतु शक्तिरूपाने अदृश्य रूपात आहे की, ते जाणून घ्यावे लागते. त्यासाठी आपल्या मनाची ठराविक बैठक तयार व्हावी लागते. चराचरातील जी ब्रह्मांडाची शक्ती तीच चैतन्य शक्ती प्राणरूपाने सर्व सजीवांना व्यापते व त्यांच्याकडून कर्मे करवून घेते. असे हे निर्गुण रूप जाणण्यासाठी हेमाडपंतांनी साईबाबांना शब्दरूपाने साकारले. भक्तांनी सगुण भक्तीकडून निर्गुण भक्तीकडे कशाप्रकारे वळावे, हे साईचरित्रात सांगितले आहे. हेमाडपंत निवेदन करतात :-

**सगुण तेंचि साकार।**
**निर्गुण तें निराकार।**
**भिन्न नाहीं परस्पर।**
**साकार निराकार एकचि ।।१३ ।।**

**सगुण निर्गुण एकचि भरलें।**
**समरसलें विश्वरूपें ।।१४ ।।**
**निर्गुणाहूनि सगुणाचें।**
**आकलन बहु सुकर साचें।**
**दृढावल्या प्रेम सगुणाचें।**
**निर्गुणाचें बोधन तें ।।१७ ।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ११**

साईबाबा मूळ निराकार-निर्गुण आहेत. भक्तरक्षणासाठी साकार-सगुण, म्हणजेच देहरूप धारण करून ते भूतलावर अवतरले आहेत. ते मायानटीचा स्वीकार करून भक्तांना अशाश्वत खोट्या संसाराच्या मोहजालातून बाहेर काढून देहबुद्धीतून आत्मबुद्धीत वळविण्याचा प्रयत्न करतात. अशा साईबाबांचे भक्तांनी सदोदित ध्यान करावे, असे हेमाडपंत सांगतात.

साईबाबा म्हणजे आनंदघन, ज्ञानस्वरूप, परम पवित्र, भवभयाचे नाश करणारे, तसेच मनातील दुष्ट विचारांचे नाश करणारे आहेत. साईबाबा आनंदाचे सागर आहेत. साईबाबांना समजून घेताना मनात अनेक वृत्तींचे तुफान उसळते, विचारलहरी उफाळतात. अशा लाटांना आवर घालणारे तारकही तेच आहेत. तर मग शक्तिशाली साईबाबा आहेत तरी कसे ?

सात्त्विक शुद्ध असे चैतन्य रूप म्हणजे साईशक्ती होय ! अशी ही शक्ती जड इंद्रियांत राहून त्यांच्याकडून विश्वाचे सारे व्यवहार करवून घेते, इंद्रिये, अवयव यांच्यात प्राणरूपाने राहून त्यांना खेळविते, तसेच चराचरातील सर्व सजीव-निर्जीवांचा ती आधार आहे. या शक्तीशिवाय साऱ्या दशदिशा ओस पडतात. अशी ही अव्यक्त प्रभावी शक्ती व्यक्तरूपाने साकार झाली, नामरूपाने, देहरूपाने, कार्यरूपाने भूतलावर दृश्य रूपात अवतरली आणि प्रत्येक जीवाला उद्धरून शिवस्वरूप करीत राहिली. यापुढेही अनंत काळ हेच कार्य ती करीत राहणार आहे. अशा या साईबाबांविषयी हेमाडपंत म्हणतात :-

**सगुणांतला जो सगुण।**
**निर्गुणांतला जो निर्गुण।**
**गुणवंतांतील जो अनुत्तम गुण।**
**गुणियांचा गुणिया गुणिराजा ।।३३ ।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय १**

❑❑❑




# साई-पत्रव्यवहार

आजचे युग संगणकाचे आहे. दूरध्वनी, दूरदर्शन, फॅक्स, ई-मेल, वेबसाइट इत्यादी गोष्टींनी मानवाने थक्क करून सोडले आहे. या सर्व गोष्टींद्वारे एकमेकांशी मनात येताच माणूस संपर्क साधून संभाषण करू शकतो, खुशाली कळवू शकतो, शुभेच्छा संदेश, सुख-दुःखाच्या वार्ता देऊ शकतो. ही सर्व प्रगती मागील दोन शतकांतील. या सर्व गोष्टींच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेली संपर्क यंत्रणा म्हणजे टपाल.

अठराशे व एकोणिसशेचा काळ घेतला, तर त्यावेळी फक्त टपालमार्गेच माणूस एकमेकांशी संपर्क साधू शकत असे. दळणवळणाच्या रस्ते वगैरे साधनांत माणसाची विशेष प्रगती झालेली नव्हती. त्यामुळे टपाल आले की, एखादी जादूची किमया झाली अशा उत्सुकतेने सारे घर धावून येई. सर्वांची खुशाली कळली की, जीव भांड्यात पडे; तर दुःखद वार्ता समजताच सारे घर धाय मोकलून रडे, दुःख करी. तर, अशा या सामाजिक परिस्थितीत संत-महंतांशी लोक कशाप्रकारे पत्रव्यवहार करून आपले मनोगत उघड करीत, याची सुंदर उदाहरणे संतचरित्रांत आढळतात.

प्रासादिक ग्रंथ श्री साईसच्चरितात साईभक्तांनी आपापल्या गावांहून साईबाबांशी पत्रव्यवहार केल्याचा उल्लेख आढळतो. एवढेच नव्हे तर, साईबाबांनीही माधवराव देशपांडे, बापूसाहेब जोग, दादा केळकर यांच्यामार्फत आपल्या बाहेरगावी असलेल्या भक्तांना पत्रे पाठवलेली आहेत. साईबाबांच्या अवतारकार्याचा काळ साधारणपणे इ. स. १८५४ ते १९१८ असा आहे. त्यावेळी दळणवळण अतिशय गैरसोयीचे होते. त्यामुळे बाहेरगावांहून शिरडीला येणाऱ्या साईभक्तांची संख्या फारच कमी असे. साईचरित्रात भक्तांनी साईबाबांशी पत्रव्यवहार करून आपल्या अडचणी साईबाबांना कळविल्याचा आणि साईबाबांनी त्यांना पत्राद्वारे मार्गदर्शन करून संकटमुक्त केल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. त्याचबरोबर पत्रव्यवहारासंबंधीचे वर्णन आणि त्याला अनुसरून कथाभाग व भक्तांचा साईबाबांबद्दलचा भक्तिभाव पहावयास मिळतो. टपालमार्गे पैसा (मनीऑर्डर), तारवाला, टपालवाला, टपाल, तार, बंगी, बिनतारी संदेश इत्यादी शब्द यासंदर्भात आलेले आहेत.

या पत्रव्यवहारातील काही पत्रांसंबंधी आपण येथे विचार करू या.

श्री साईसच्चरितातील अध्याय ४०, ओव्या २६ ते ३३ व ८५ ते १०२ मधून साईबाबांचे चिंधीचोर लाडके भक्त मामलेदार देव (डहाणू) यांच्याकडील व्रतउद्यापनाविषयी

त्यांचा व साईबाबांचा एकमेकांशी पत्रव्यवहार झाल्याचे वर्णन आहे. साईबाबांनी देवांच्या शुद्ध भक्तिभावाचे आमंत्रण, जे पत्ररूपाने त्यांना आले ते, स्वीकारले व नंतर पत्ररूपानेच त्यांना उत्तरही दिलेले आहे.

**देव जोगांस पत्र लिहिती।**
**कराया विनंती बाबांस ॥२६॥**
**शुद्धभावाचें आमंत्रण।**
**बाबांनीं ऐकूनि घेतलें संपूर्ण ॥३१॥**
**"तूं मी आणि तिसरा एक।**
**तिघे मिळूनि जाऊं देख।**
**पाठवूनि दे ऐसा लेख।**
**पावेल हरिख लिहिणारा" ॥३३॥**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ४०**

साईबाबा सांगितल्याप्रमाणे देवांकडे जाऊन जेवून आले; परंतु देव त्यांना ओळखू शकले नाहीत. त्यांनी परत शिरडीला पत्र लिहिले. त्यालाही साईबाबांनी जोगांमार्फत पत्राने उत्तर दिले; ते असे :-

**"सांग तया त्वां मज नोळखिलें।**
**कां मग बोलाविलें होतेंस" ॥८६॥**
**"पहा मी माझिया वचनाकारणें।**
**मरोनि जाईन जीवें प्राणें।**
**परी माझिया मुखींचीं वचनें।**
**अन्यथा होणें नाहीं कदा" ॥९१॥**
**पुढें मग हें वृत्त।**
**जोग कळविती देवांप्रत।**
**पत्र एक सविस्तर धाडीत।**
**अतिमुदित मानसें ॥९३॥**
**देवांनीं जैं पत्र वाचिलें।**
**प्रेमोद्रेकें नेत्र ओथंबले।**
**धिक्धिक् व्यर्थ साईस दूषिलें।**
**बहु हिरमुसले मनांत ॥९४॥**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ४०**

या पत्रातून जाणवतो तो शुद्ध, निर्मळ भक्तिभाव, जो संतांना खूप प्रिय आहे.

दुसरे पत्र आहे ते अध्याय २५ मधील ओव्या २८ ते ३२ मधून वर्णन केलेले बाबांचा लाडका भक्त - गुरुपुत्र दामूअण्णा कासार यांचे. लाखाचा धनी होण्याची संधी मिळत असल्याचे वाटून, मुंबईच्या मित्राच्या आग्रहावरून भागीदारीत कापसाचा व्यापार करण्याविषयी दामूअण्णा शिरडीला साईबाबांना पत्र लिहून विचारणा करतात. साईबाबा माधवराव देशपांडे यांना दामूअण्णांना पत्र लिहावयास सांगून त्यांची चांगलीच कानउघडणी करतात; ती अशी :-

**दामूअण्णाही गुरुपुत्र।**
**बाबांस लिहिते झाले पत्र।**
**आम्हां न बुद्धि स्वतंत्र।**
**आपणचि छत्र आम्हांतें ॥३३॥**
**पत्र लिहिलें माधवरावा।**
**कीं हें बाबांस वाचूनि दावा।**
**आज्ञा होईल तैसें कळवा।**
**उद्यम बरवा वाटतो ॥३५॥**
**कळकळूनि मग बाबा वदती।**
**"चळली मती शेटीची ॥४३॥**
**सांग कीं तयास प्रत्युत्तरीं।**
**काय उणें तुज असतां घरीं।**
**पुरे आपुली अर्धी भाकरी।**
**लाखाचे भरी पडूं नको" ॥४४॥**

**- श्री साईसच्चरित, अध्याय २५**

साईबाबा प्रत्येक भक्ताचे भूत-भविष्य-वर्तमान जाणत होते. आपल्या भक्तांचे हित हेच त्यांचे ब्रीद. त्यांनी दामूअण्णांना तोट्यातून वाचविले.

तिसरे पत्र आहे ते वांद्याचे बाबासाहेब तर्खड व त्यांचा मुलगा रामचंद्र यांचे. बाबासाहेबांचा मुलगा व मुलाची आई ही दोघं शिरडीला साईबाबांच्या दर्शनाला आली. त्यावेळी बाबासाहेबांच्या हातून जो प्रमाद घडला व त्याचा पश्चात्ताप सर्व परिवाराला कसा झाला, त्याविषयीच्या पत्रासंबंधातील कथाभाग अध्याय ९ मध्ये ओव्या १०१ ते ११३ मधून वर्णन केलेला आहे.

**ऐसें वदत मुलास पत्र।**
**धाडिलें होऊनि अति लाचार।**
**"घडला मजकडूनि प्रमाद थोर।**
**क्षमा कर गा" प्रार्थावें ॥१०१॥**